



# गोदातीर समाचार

स्थापना - १९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com







# महाराष्ट्राची लेक ठरली बुद्धिबळाची राणी!

## दिव्या देशमुखने वर्ल्ड कप जिंकून रचला इतिहास

**मुंबई (प्रतिनिधी)–** जॉर्जिया देशातील बटुमी शहरात पार पडलेल्या महिला बुद्धिबळ वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या दिव्या देशमुखने इतिहास रचला. तिने अनुभवी आणि उच्च मानांकन असलेल्या कोनेरू हम्पीचा पराभव करत हे प्रतिष्ठेचे विजेतेपद आपल्या नावे केले. असे विजेतेपद पटकवणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली आहे. सामन्याच्या मुख्य फेऱ्यांमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये एक रोमांचक सामना पाहायला मिळाला. दिव्याने कोणतीही चूक न करता हम्पीला ड्रॉवर रोखले आणि सामना टायब्रेकरपर्यंत नेला. टायब्रेकरमध्ये काळ्या मोहरांवर खेळताना दिव्याने अत्यंत हुशारीने आणि आत्मविश्वासाने खेळ करत निर्णायक विजय मिळवला.

सामन्यात एक क्षण असा आला होता, जिथे हम्पीकडे पुन्हा सामन्यात परतण्याची संधी होती. मात्र, ती त्या संधीचं रूपांतर विजयात करू शकली नाही. दुसरीकडे, दिव्याने कोणताही चुक न करता ऐतिहासिक कामगिरी केली आणि महिला बुद्धिबळ वर्ल्ड कप जिंकला.

जर अंतिम फेरीतील सामन्यात दोन्ही खेळाडूंचा स्कोअर बरोबरीत राहिला, तर निकाल लागण्यासाठी



टायब्रेकर राउंड खेळवले जातात. या टायब्रेकरमध्ये प्रत्येक खेळाडूला १५-१५ मिनिटे दिली जातात आणि प्रत्येक चालीनंतर १० सेकंद वाढवले जातात, जर स्कोअर अजूनही बरोबरीत राहिला असता, तर पुन्हा एकदा १०-१० मिनिटांचे आणखी एक सेट खेळवले गेले असते, त्यातही प्रत्येक चालीनंतर १० सेकंद मिळाले असते. पण या सगळ्याची गरजच पडली नाही, कारण दिव्याने पहिल्याच टायब्रेकरमध्ये हम्पीला मात दिली आणि थेट विजेतेपदावर कब्जा केला.

नागपूरची १९ वर्षांची दिव्या देशमुख आता केवळ वर्ल्ड कप विजेतीच नाही, तर तिने या ऐतिहासिक विजयासोबत ग्रँडमास्टरचा मानही मिळवला आहे. या क्षणी दिव्या खूपच भावूक झाली होती. तिच्यासाठी हे आयुष्यातलं अविस्मरणीय क्षण ठरले. विशेष म्हणजे, दिव्या आधीच 'कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरली आहे, जे बुद्धिबळ विश्वविजेतेपदाच्या वाटचालीतलं एक महत्त्वाचं पाऊल आहे.

महिला वर्ल्ड कप २०२५ जिंकणाऱ्या दिव्या देशमुखला विजेतेपदाबरोबरच सुमारे ४२ लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे. उपविजेती कोनेरू हम्पी हिला ३५,००० डॉलर्स म्हणजेच सुमारे ३० लाख रुपये मिळाले. या दोन्ही खेळाडूंनी बुद्धिबळातील अत्यंत प्रतिष्ठेच्या कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्रता मिळवली आहे, जे विश्वविजेतेपदाच्या दिशेने एक मोठं पाऊल मानलं जातं. भारतामध्ये बुद्धिबळाचं क्रेझ वेगाने वाढत आहे, आणि त्यामुळे या दोघींनाही नवीन स्पॉन्सर्स, ब्रँड डील्स आणि व्यावसायिक संधी मिळण्याची शक्यता प्रचंड आहे. भारताची बुद्धिबळाची दुनिया आता नवी दिशा घेत आहे, आणि दिव्या देशमुख या प्रवासाची आघाडीची खेळाडू ठरली आहे.

## संसदेत ऑपरेशन सिंदूरवर वादळी चर्चा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अखेर एका आठवड्याच्या गदारोळानंतर संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सोमवारी 'ऑपरेशन सिंदूर' आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर चर्चेला दणक्यात सुरुवात झाली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लोकसभेत चर्चेला सुरुवात करत, भारतीय लष्कराच्या शौर्याचे कौतुक केले आणि या कारवाईत १०० हून अधिक दहशतवादी व त्यांचे सूत्रधार मारले गेल्याची माहिती दिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ऑपरेशन सिंदूर संदर्भात सोमवारी संसदेत महत्त्वाची माहिती दिली. विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून अनेकदा ऑपरेशन सिंदूर संदर्भात चर्चेची मागणी करण्यात आली. संसदेच विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी झाली. सोमवारी सकाळी संसेदत मोठा गदारोळ पहायला मिळाला. त्यामुळे सुरुवातीला कामकाज तहकूब करावं लागलं. दुपारनंतर राजनाथ सिंह यांनी ऑपरेशन सिंदूर संदर्भात प्रश्नांची उत्तर देत विरोधकांचा दावा फेटाळला.

# ऑपरेशन आधीच उंदराने पाय कुरतडला; शासकीय रुग्णालयातील धक्कादायक प्रकार

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील श्री गुरुगोविंद सिंघजी स्मारक शासकीय रुग्णालयातील सर्जरी विभागात उपचार घेत असलेल्या एका रुग्णाला चक्क उंदरानं चावा घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दरम्यान या प्रकरणाची माहिती समजताच नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर यांनी रुग्णालयाला भेट देऊन जखमी रूग्णाची विचारपूस केली तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्याशीही चर्चा केली.

नांदेड शहरातील जिल्हा रुग्णालयात शुगरचा त्रास जाणवत असल्यानं एक उपचारासाठी रुग्ण शनिवारी दाखल झाला. पहिल्या दिवशी रुग्णावर आयसीयू विभागात उपचार करण्यात आले. त्यानंतर पायावर शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णाला सर्जरी विभागात वॉर्ड नंबर २८ मध्ये दाखल केले. रात्री झोपेत असताना रुग्णाच्या शरीरावर उंदरानं चावा घेतला. ही बाब रुग्ण आणि कुटुंबियांच्या लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केली. यावेळी तेथे उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी उंदराला हाकललं. मात्र, तोपर्यंत रुग्णाच्या पायाला जखमा झाल्या होत्या, असा आरोप रुग्णाच्या नातेवाईकांनी केला. या घटनेमुळं रुग्णासह





नातेवाईकांनी संताप व्यक्त केला.

जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णाचा उंदरानं चावा घेतल्याच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या विश्वासार्हतेला गालबोट लागले आहे, अशी प्रतिक्रिया नागरिक देत आहेत. येथील रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक २८ तसंच आयसीयू विभागामध्ये लावलेले बेसिन, नळांची अवस्था खराब आहे, असे रुग्णाच्या नातेवाईकांनी सांगितले.

शुगरचा त्रास झाल्यामुळे मी उपचार घेण्यासाठी नांदेड जिल्हा रुग्णालयात गेलो होतो. तसेच पायाची शस्त्रक्रिया करायची असल्याने मला सर्जरी विभागात दाखल केले. शस्त्रक्रिया झाल्यावर मी झोपेत असताना उंदराने माझ्या पायाचा चावा घेतला. त्यानंतर त्या ठिकाणातून रक्तस्राव सुरू झाला. याबाबत मी डॉक्टरांना सांगितलं. यानंतर त्यांनी माझ्यावर उपचार केले. तसेच रुग्णालयात स्वच्छतेचा अभाव आहे, असा आरोप रुग्ण रमेश येन्नावर यांनी केला आहे.

### उंदीर शिरणार नाही याची खबरदारी घेतली

रुग्णाला आमच्या फिजिशियन डॉक्टरनं तपासलं त्यावेळी उंदराचे बाइट मार्क दिसले नाहीत. त्यामुळं या प्रकरणाबाबत मला माहिती दिली नव्हती. परंतु, रुग्णावर आवश्यक असलेले उपचार केले असून, उंदराच्या बंदोबस्तासाठी प्रत्येक वॉर्डात रॅटकिल मशीन लावले आहेत. वॉर्डात उंदीर शिरणार नाहीत याची खबरदारी घेतली आहे, असं स्पष्टीकरण जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय पेरके यांनी दिली आहे.

# माजी खा. किरीट सोमय्या अचानक अर्धापूर पोलीस ठाण्यात

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** माजी खा. किरीट सोमय्या हे अचानक सोमवारी अर्धापूर पोलीस ठाण्यात दाखल झाले होते. येथील ग्रामीण रुग्णालयाच्यावतीने ८२ जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. या प्रकरणी संबंधीतावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माजी खा. सोमय्या यांच्या अचानक पोलीस ठाण्याच्या भेटीने उलट सुलट चर्चेला उत आला आहे.

महाराष्ट्रातील बोगस जन्म प्रमाणपत्र प्रकरणी सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक मुंबई मंत्रालयात पार पडली असून सर्व बोगस जन्म प्रमाणपत्र १५ ऑगस्टपर्यंत वापस घेण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. या बोगस जन्म प्रमाणपत्राचा वापर कोणी केला याची माहिती वरिष्ठ स्तरावर चौकशी सुरू आहे. किरीट सोमय्या हे नांदेडकडे जाताना अचानकपणे अर्धापूर पोलीस ठाण्यात आले व पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांची भेट घेतली. सोमय्या यांच्या अचानक भेटीमुळे अनेक तर्क-वितर्क लावले जात असून या भेटी मागे 'कुछ तो गडबड हैश अशी चर्चा होत आहे.

यापुर्वी दि.२७ मे रोजी ग्रामीण रुग्णालय अर्धापूर येथे माजी खा.किरीट सोमय्या यांनी भेट देऊन प्रमाणपत्र कसे दिले. ग्रामीण रूग्णालय अस्तित्वात नसलेल्या तारखेत सुध्दा जन्म झाल्याचे प्रमाणपत्र दिले गेले. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून जन्म ग्रामीण रुग्णालयात झाला असल्याचे प्रमाणपत्र कसे दिले यासंबंधी रुग्णालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली होती. रूग्णालयात दाखल न करता बोगस जन्म दाखले अर्धवट माहिती देऊन कसे देण्यात आले, याची माहिती



घेतली होती. त्यानंतर सोमवारी परत अर्धापूर पोलीस ठाण्याला भेट दिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

यावेळी पोलीस निरक्षक चंद्रशेखर कदम, सहायक पोलीस निरीक्षक विष्णुपंत कराळे, ठाणे अंमलदार जमादार विजय आडे, साहेबराव शिंदे, आर. एस.नरवाडे, संभाजी गौहरकर आदींसह अनेक पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# सिडको शिवसेनेचा बालेकिल्ला पुन्हा अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्नशील -आ.हेमंत पाटील



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको शिवसेनेचा बालेकिल्ला पुन्हा अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न करा. युती असो किंवा नसो तुम्ही तयारीला लागा असे आवाहन आ. हेमंत पाटील यांनी सिडको येथे आयोजित बैठकीत केले.

आगामी नांदेड मनपा निवडणूक निमित्ताने सिडको येथील धुत बँकेट हॉल येथे दि. २८ जुलै रोजी आयोजित पदाधिकारी व शिवसैनिक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती, यावेळी आ. आनंदराव पाटील बोंढारकर, दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, माजी नगरसेवक, बाळासाहेब देशमुख, राजेंद्र कुलथे, सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे, ओबीसी जिल्हा प्रमुख अनिल पाटील धमणे, महिला आघाडीच्या स्मिता कुलकर्णी, गजानन राजूरवार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आ.हेमंत पाटील यांनी आगामी निवडणुकीसाठी युती झाली तर चांगलेच आहे. तसेच स्वबळाची भाषा होत असल्यास शिवसेना स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे सांगून, इच्छुकांनी जिल्हाप्रमुख यांच्याशी संपर्क ठेवावा असे सांगितले.

यावेळी शिवसेनेचे दक्षिण जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांनी आगामी निवडणुकीसाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे सांगितले.

बैठकीचे सुत्रसंचलन मारोती धुमाळ यांनी केले. या बैठकीस माजी सरपंच सुदीन बागल, भालचंद्र मोळके, पिंटू महाराज, संजय लहानकर, सतिश खैरे, पप्पू गायकवाड, राजू टमना, शिवाजी धुमाळ, भालचंद्र नाईक, रामेश्वर काळे, कृष्णा पांचाळ, संतोष खैरे, संजय जोंधळे, पंडित गजभारे, आनंद सरोदे, अंकुश शिखरे, रवि थोरात, विजय पांचाळ यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवू -आ. बोंढारकर

शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात लाडक्या बहिणींना आणि भावांनाही भरघोस पाठबळ देण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील जनता शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याची प्रचिती नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आली आहे. ना. हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघावर बहाद्दर शिवसैनिकांनी एकनिष्ठेने काम करून शिवसेनेचा भगवा फडकवला. आता महानगरपालिकेत गेल्या पन्नास वर्षांपासून ठाण मांडून बसलेल्यांना हुसकावून लावून तेथे जनतेचे राज्य आणण्यासाठी मनपावर शिवसेनेचा भगवा फडकवू. यासाठी शिवसैनिकांनी ताकतीने कामाला लागावे असे आवाहन आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी केले आहे.

# रेल्वेतील फुकट्या प्रवाशांविरुद्ध दंडात्मक कारवाई; ७३ हजार जणांकडून चार कोटींची वसुली

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागांतर्गत सातत्यपूर्ण तिकीट तपासणीमुळे एप्रिल ते जूनपर्यंत नांदेड विभागाने विनातिकीट प्रवास केल्याबद्दल, अनियमित तिकिटावर प्रवास केल्याबद्दल आणि सामान न बुक केल्याबद्दल ७३ हजारांहून अधिक अनधिकृत प्रवाशांना दंड ठोठावला. यामध्ये एकूण ४ कोटी ११ लाख रुपये वसूल केले.

दि. २२ जूलै रोजी तिकीट तपासणी पथक बसने सिंगणापूर हॉल्टवर पोहोचले आणि ट्रेन क्रमांक ७७६१५ आणि १७६१३ वर ॲम्बश तपासणी केली, ज्याचा उद्देश तिकीट नसलेले प्रवासी, आरक्षित डब्यांमध्ये प्रवास करणारे सीझन तिकीट धारक आणि अनाधिकृत फेरीवाले यांच्यात नैतिक दडपण निर्माण करणे होता. परभणी, पोखर्णी नरसिंहा आणि पूर्णा यासारख्या लगतच्या स्थानकांवरून जाणाऱ्या गाड्यांमध्येही अचानक तपासणी करण्यात आली. या मोहिमेदरम्यान दहा गाड्यांची कसून तपासणी करण्यात आली.

या मोहिमेत २६ तिकीट तपासणी कर्मचारी, २ वाणिज्य निरीक्षक आणि २ आरपीएफ कर्मचारी सहभागी झाले होते. या मोहिमेदरम्यान १५ गाड्यांची तपासणी करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान तिकीट न भरणे, अनियमित प्रवास करणे आणि बुक न केलेले सामान असे एकूण ३९४ प्रकरणे आढळून आली. या प्रवाशांकडून १ लाख ४४ हजार ९५ रुपये वसूल करण्यात आले.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले आणि अप्पर विभागीय रेल्वे व्यवस्थापक आर. के. मीना यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमा नियमितपणे राबविल्या जात आहेत जेणेकरून संपूर्ण विभागात सुरक्षित, निष्पक्ष आणि शिस्तबद्ध प्रवास सुनिश्चित करता येईल.

एप्रिल ते जूनपर्यंत, नांदेड विभागाने ७३ हजारांहून अधिक अनधिकृत प्रवाशांना विनातिकीट प्रवास करणे, अनियमित तिकिटावर प्रवास करणे आणि सामान न बुक करणे यासाठी दंड ठोठावला, एकूण ४.११ कोटी रुपये वसूल केले. चालू जुलै महिन्यात (२० जूलैपर्यंत) तिकीट न भरणे आणि इतर अनियमिततेच्या १२,८०३ प्रकरणांमध्ये ६२.८५ लाख रुपये वसूल केले.

# महायुती एकत्र लढणार, फडणवीसांची घोषणा

## 'मित्र पक्षांवर टीका नको'

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यामध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुका महायुती आणि महाविकास आघाडी एकत्र लढणार की स्वतंत्र, यावर अनेक तर्कवितर्क लावले जात होते. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी थेट घोषणा केली की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीमध्ये एकत्र लढणार आहोत. त्यांनी कार्यकर्त्यांना आदेश दिला की, जिथे महायुतीमध्ये निवडणूक काही कारणांनी होणार नाही, तिकडे मित्र पक्षांवर कुठलीही टीका करायची नाही. समन्वय ठेवून मैत्रीपूर्ण लढत करायची आहे. आपल्या मित्र पक्षावर कुठलीही टीका करायची नाही, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.




# पहिल्या श्रावण सोमवारी शहरातील महादेव मंदिरांत भाविकांची अलोट गर्दी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** येथील काळेश्वर, चैतन्यनगर आणि शहरापासून जवळच असलेल्या मरळक येथील जागृत महादेव मंदिरामध्ये श्रावणाच्या पवित्र महिन्यातील पहिल्या सोमवारी मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी महादेवाच्या चरणी बेलपत्र व धोत्र्याचं फूल अर्पण करत आस्थेने दर्शन घेतले.

पहिल्या श्रावण सोमवार, दि. २८ जूलै रोजी सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात रांगा लावल्या होत्या. एकूणच सोमवारच्या दिवशी श्रावणात महादेवाच्या भक्तीत न्हालेलं वातावरण सर्वत्र पवित्रतेचा अनुभव देत आहे, तर शिवापती मंदिरात पुरातन शिवलींग दर्शन व आरतीसाठी महिलांची गर्दी होतं आहे.







काळेश्वर मंदिर विश्वस्त समिती यांच्यावतीने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्रावण मास निमित्ताने भाविक-भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. याठिकाणी ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी मोठ्या प्रमाणात अधिकारी, पोलीस अंमलदार, महिला पोलीस, होमगार्ड यांच्या कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

काळेश्वर मंदिर याठिकाणी पहिल्या श्रावण सोमवारी नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर, माजी आ.मोहनराव हंबर्डे, डॉ.संतुकराव हंबर्डे सरपंच संध्या हंबर्डे, उपसरपंच अर्चना हंबर्डे, सरपंच प्रतिनिधी राजू हंबर्डे व उपसरपंच विश्वनाथ हंबर्डे, ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी यांच्यासह भाविकांनी दर्शन घेतले.

यासह शहरातील चैतन्यनगर येथील महादेव मंदिरामध्ये सकाळी तीन वाजल्यापासूनच भाविक भक्तांनी विशेष करून महिलांनी अनवाणी पायाने येऊन महादेवाचे दर्शन घेतले. बेलपत्र, धोत्र्याचे फुल, नारळ, दही, दूध, कापूर टाकून विधीवत पूजा केली. तसेच सांगवी आसना बायपास पुलाखाली असलेल्या आसनेश्वर महादेव मंदिरामध्ये सांगवी बु., कामठा, म्हाळजा, गाडेगाव, पिंपळगाव महादेव, दिग्रस- नांदला खडकुत आदी भागातून आलेल्या भाविक भक्तांनी दर्शन घेतले.


तसेच नांदेडपासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या मरळक येथील इमलेश्वर महादेवांची पूजा पाठ करून पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शन घेतले. श्रावण महिन्यातील पहिला सोमवार असल्याने अनेकांनी प्रत्यक्ष मंदिरात जाऊन रांगेमध्ये उभे राहून दर्शन घेतले. या मंदिरातही पहाटे दोन वाजल्यापासून भाविक भक्तांच्या रांगा होत्या. जागोजागी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक भाविकांनी दुग्धाभिषेक केला. दिवसभर सर्वच महादेव मंदिर परिसरांमध्ये भक्तिमय वातावरण पहावयास मिळाले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# धर्मस्थळातील वाद!

दक्षिण भारतातील कर्नाटक राज्यातील दक्षिण कन्नड जिल्हा गेल्या दोन दशकांहून अधिक काळ धार्मिक ध्रुवीकरणासाठी चर्चेचा विषय राहिलेला. येथे हिंदू आणि मुस्लिम समुदायांमध्ये निर्माण होणाऱ्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे अनेकदा सामाजिक सलोख्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. निवडणूक प्रक्रियेमध्येही या भागात स्पष्ट धार्मिक रेषा उमटलेल्या दिसतात. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत येथे भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) उमेदवारांनी बहुसंख्येने विजय मिळवला, तर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी लाटेच्या जोरावर भगव्या पक्षाला सहज यश मिळाले. या पार्श्वभूमीवर धर्मस्थळ या पवित्र नगरात उफाळून आलेल्या 'सामूहिक दफन विधी' संदर्भातील वादाने संपूर्ण राज्याचे लक्ष पुन्हा एकदा दक्षिण कन्नडकडे वळवले आहे. एका अनाम व्यक्तीने दावा केला की, गेल्या वीस वर्षांहून अधिक काळात अनेक महिलांची सामूहिक दफनविधी धर्मस्थळात करण्यात आली. या गंभीर आरोपामुळे केवळ स्थानिकच नव्हे, तर राज्यातील सामाजिक आणि राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली आहे. धर्मस्थळ हे धार्मिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण ठिकाण आहे. येथे श्री मंजुनाथ स्वामी मंदिराचे प्रशासन जैन समुदायाच्या हस्ते चालवले जाते, तर पूजा विधी मात्र वैष्णव परंपरेनुसार हिंदू पुरोहित करत असतात. शैव आणि वैष्णव परंपरामध्ये ऐतिहासिकदृष्ट्या स्वतंत्र देवस्थाने असली, तरी धर्मस्थळात या दोघांचे अस्तित्त्व पाहायला मिळते. मात्र सध्या या परंपरेलाही संशयाच्या नजरेने पाहिले जात आहे. या प्रकरणात आता अनेक स्तरांवर हालचाली सुरू झाल्या आहेत. जैन समुदायाने स्वतंत्र विशेष तपास पथक स्थापन करण्याची मागणी केली आहे. राज्याचे गृहमंत्री याबाबत संपूर्ण चित्र लक्षात घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे सांगत आहेत. दरम्यान, मंदिर प्रशासनाने या आरोपांमुळे आपली बदनामी होत असल्याचा आरोप करत न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आणि माध्यमांवर नियंत्रण लागू करण्यात आले आहे. तथापि, याविरोधात माध्यम संस्था आता सर्वोच्च न्यायालयात अपील करत आहेत. या प्रकरणात सामाजिक प्रगल्भतेची भूमिका घेणाऱ्या घटकांनी शोध पथकाची स्थापना स्वागतार्ह मानली असली, तरी त्यांनी तपासाची पारदर्शकता आणि निष्पक्षता यावर भर दिला आहे. एफआयआर दाखल होऊन वीस दिवस उलटून गेले, तरी संबंधित ठिकाणी पुराव्यांची शवउत्खननाची प्रक्रिया का पार पडली नाही, हा प्रश्न विचारला जात आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले की, या भागात अनैसर्गिक मृत्यू, खून, बलात्कार किंवा गंभीर गुन्हे घडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या विधानामुळे या प्रकरणात गंभीर गुन्ह्यांच्या शक्यतेचे संकेत मिळतात आणि त्यामुळेच अनेकांच्या दृष्टीनेही केवळ एक धार्मिक वादाचे प्रकरण न राहता संभाव्य गुन्हेगारी कटकारस्थान म्हणून समोर येऊ शकते. या वादात राजकीय पक्षांचीदेखील भूमिका लक्षवेधी आहे. सत्ताधारी काँग्रेस पक्षाने ठाम आणि ठोस भूमिकेची तयारी दर्शवली आहे. दुसरीकडे भाजप हा विषय अत्यंत काळजीपूर्वक हाताळत असून, प्रत्यक्ष काही निष्कर्ष हाती लागेपर्यंत संयम बाळगतो आहे. हे प्रकरण केवळ धार्मिक संवेदनशीलतेचेच नाही, तर एकूणच सामाजिक न्याय, व्यवस्थापनातील पारदर्शकता आणि सत्ताधाऱ्यांची जबाबदारी या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. दक्षिण कन्नडमधील असहिष्णुतेच्या पार्श्वभूमीवर धर्मस्थळातील प्रकरण भविष्यात एक मोठे धर्म-राजकीय रणांगण बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झाले तर हे प्रकरण केवळ धार्मिक समतेचा नाही, तर राज्याच्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेचा कस पाहणारे ठरेल. याचे पडसाद संपूर्ण देशभरामध्ये उमटू शकतात हेही संबंधित प्रशासनाने आणि भोंदूगिरी करणाऱ्या राजकीय नेत्यांनी विसरू नये. आता हा वाद निवळतो, की आणखी खोलात जातो, हे येणारा काळच ठरवेल. मात्र, जोपर्यंत सत्याचा संपूर्ण शोध, निष्पक्ष चौकशी आणि दोषींवर कारवाई होत नाही, तोपर्यंत धर्मस्थळातील वाद हा एक नव्या संघर्षाचा केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे.

# आपल्या दु:खाचे वारुळ करु नका!



पुरंदरे आणि पु. लं. ची मैत्री मराठी साहित्य प्रांत जाणतो. एक विनोद प्रांतातील दिग्गज तर दुसरे रोमहर्षक व जिवंत इतिहास श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभे करणारे महाराष्ट्र भूषण. विनोदी लेखक, वक्ते ही पु. लं. ची प्रतिमा लक्षात घेवून त्यांना त्यांच्या घरातील विनोदी वातावरणाविषयी काही बोलावं व त्यातून विनोदनिर्मिती करावी अशी लहर पुरंदरेंना आली. ते पु. लं. ना म्हणाले, तुमच्या घरात सारखे विनोद चालत असतील नाही का? तुम्ही विनोद सांगत आहात आणि सुनीताबाई सारख्या हसत आहेत.असं आनंदी वातावरण पूर्ण महाराष्ट्रात कुठेही नसेल. सत्य बाब अशी की, पु. लं. सारखे विनोद करायचे. तेंव्हा बरेचदा सुनीताबाई रागावयच्या. नेहमी म्हस्करी करण्यापेक्षा त्यांनी काही वेळा तरी गंभीर व्हावं, अशी त्यांची अपेक्षा असायची. शिवाय विनोद करण्यासाठी काही वेळा गंभीर व्हावं लागतं. त्यासाठीही चिंतन, मनन करावं लागतं याची जाणं एखाद्या सामान्य माणसांना नसणे हे पु. लं. समजू शकत होते, पण असा प्रश्न खुद्द बाबासाहेबांनीच विचारावा ? हा त्यांचा गैरसमज त्वरित दुर करण्यासाठी ते म्हणाले, बाबासाहेब तुम्ही थोर इतिहासतज्ज्ञ, शिवचरित्राचे गाढे अभ्यासक, अवघे शिवचरित्र तुम्ही श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभे करता. महाराज अमावश्येच्या रात्री गडावर कसे चालले? याचे दिवसा वर्णन करुन आपल्या सादरीकरणाने प्रसंग जीवंत उभा करता, त्यामुळे मी असा निष्कर्ष काढू शकतो. तुमच्या घरात सारखे युद्ध चालत असेल? निर्मलाबाई तुमच्या मागे लाटणं घेवून धावत आहेत आणि तुम्ही, नाही... नाही...नको...नको... म्हणत या दालनातून त्या दालनात सारखा पळ काढतं असाल. या विनोदाने उपस्थितांना मेजवाणी तर मिळालीच, पण खुद्द बाबासाहेबसुद्धा मनसोक्त हसले.

विनोदी जीवन जगणाऱ्या माणसाच्या जीवनात अनेक दु:ख असतात, पण तो आपल्या दु:खाचे कधी भांडवल करत नाही. आपले दु:ख आपल्या उरात दाबून दु:खाने उर भरून आपली छाती छप्पन इंच करून आपल्या चेहऱ्यावरील हास्य कधीच नष्ट होवू देत नाही. आपल्या संपर्कात येणाऱ्या सर्वांना प्राप्त प्रसंगातून हसवण्याचा आणि त्यातून आनंद निर्मिती करण्याचा त्याचा प्रामाणिक प्रयत्न असतो. आपल्या संपर्कातील प्रत्येक माणूस तणावमुक्त व्हावा. हाच त्याचा शुद्ध, निर्मळ, प्रांजळ आणि प्रामाणिक हेतू असतो. पण मित्रहो, आपल्या तणावाचे भांडवल करणाऱ्या टेंशन मास्तरांचे नेमके काय करावे? तेच अनेकदा कळत नाही. बरं ते टेंशनमध्ये आहेत का? असल्यास नेमके किती? याचे मोजमाप करण्याचे कोणतेही यंत्र विनोदी जीवन जगणाऱ्या कोणत्याच माणसाजवळ नसल्यामुळे हा आपल्याला भेटल्यावर साधा 'टेंशन मास्तर'आहे का? त्याची अवस्था टेंशन चा पारा चढून चढून पार 'टेंशन सम्राट' झाली आहे? काहीच कळायला मार्ग नसतो.

असाच आमच्या संपर्कातील संभाजीनगर शहरात राहणारा एक तुकाराम शिंदे नावाचा मित्र. एका नामवंत कॉलेजवर मराठीचा प्राध्यापक. संत वाङ्.मयावर आपला खूप अभ्यास आहे, असा त्याचा दावा. त्यामुळे माझ्या वर्तनात खूप बदल झाला आहे असेही छातीठोकपणे तो सांगायचा. मला फोनवरुन बोलताना नेहमी सांगायचा, तू हल्ली विनोदावर बरेच काही लिहीत असतो. त्याने तणावमुक्ती होते, असा तुझा ठाम विश्वास आहे, पण संत साहित्यात जी ताकद आहे ती तुमच्या या फाजिल विनोदात नाही. तू एकदा संभाजीनगरला ये. मला तुझ्याशी खूप बोलायचं. संत साहित्य म्हणजे काय? माझ्याशी चर्चा केल्यावरच तुला कळेलं. बोलता बोलता संत साहित्याच्या या अभ्यासकाच्या वाणीतून शेवटी जो अहंकाराचा दर्प बाहेर आला. त्या क्षणी माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली. या महाविद्वानाकडे आपण जायचे नाही, हे मी ठरवून टाकले, पण योगायोग असा की मध्यंतरी माझ्याकडे त्याने सहपरिवार भेट दिली. त्याच्याकडे आम्ही सर्वांनी यावे, असा त्या सर्व कुटुंबाचा आग्रह आणि त्यानंतरही फोन, त्यामुळे माझ्या कामानिमित्ताने मी एकदा संभाजीनगरला गेलो.

माझ्या नियोजनानुसार माझी सर्व कामे आटोपून या संत तुकारामाची भेट घेण्यास निघालो. तशी पूर्व- कल्पना त्याला दिली होती. त्याच्याकडून यथासांग स्वागत झाले. रात्रीचे जेवण झाल्यावर बाहेर जावून थोडे चालावे आणि चालत चालत काही बोलावे. ते शक्य झाले नाही तर परम मित्र तुकारामकडून बरेच काही ऐकावे. संत साहित्याच्या गाढ्या अभ्यासकाच्या सहवासात मी होतो. याचा मला सार्थ अभिमान होता. तुकाराम सांगू लागला. संताच्या पायाखाली एखादी मुंगी जरी आली आणि तिचा मृत्यू झाला तरी व्यथित होणारं मन त्यांच्याजवळ असतं आणि आपण स्नान करण्यासाठी स्नानगृहात गेलो. तिथे आपल्याला मुंग्याची रांग लागलेली आहे असे दिसले तर लगेच आपण बादलीभर पाणी घेतो आणि स्नानगृह स्वच्छ करतो आणि त्या मुंग्यासाठी महापूर निर्माण करतो. या आपल्या कृतिने आपण किती मुंग्यांची हत्या करत असतो. तरीही या आपल्या अन्यायी-अत्याचारी वृत्तीने आपण कधी दु:खी होतो का? या आपल्या अमानुष वर्तनावर संत साहित्यात जे उत्तर आहे, ते इतर साहित्यात आहे का? तुमच्या विनोदी साहित्यात तर मुळीच नाही. तो संत साहित्यावर त्याचे खूप आग्रही मत मांडत होता. त्यामुळे त्याच्याशी संवाद करण्याऐवजी मी उत्कृष्ठ श्रोता होणे पसंत केले. त्याचे एकतर्फी बोलणे सुरु होते. मी आपला वा.. वा.. बहोत अच्छे..क्या बात है। असे सर्व सुरू होते. काय करणार? आलीया भोगासी असावे...अशी माझी अवस्था सुरू होती. बरे त्यात विनोदाला कुठेही वाव नव्हता. कारण या तुकारामाच्या मते, विनोदी साहित्य म्हणजे अतिशय चिल्लर, थिल्लर, इतकेच नव्हे तर निव्वळ कचरा. हे सर्व विनोदी साहित्यिक गुढघाभर पाण्यात उड्या मारणारे. त्यांच्या विचारा-आचारात कोणतीही खोली नाही. आम्ही कसे अथांग सागरात पोहनारे.असे मत व्यक्त करुन स्वत:भोवती आत्म स्तुतीचे डोंगर उभे करण्याचे प्रयोग या तुकारामाचे सुरु होते. संत साहित्याच्याअभ्यासाने माणसात असा काही बदल होतो का?यावर माझे चिंतन सुरु झाले. मला माझ्या प्रश्नाचे उत्तर कसे मिळेलं यासाठी मी अस्वस्थ झालो होतो.त्याचे मात्र संत वाङ्मयावरचे अखंड प्रवचन सुरु होते.मी ते किती ऐकतोय किंवा ऐकतच नाही.याच्याशी त्याला काही फारसे देणेघेणे नव्हते.

एवढ्यात त्याचा एक मित्र आम्हाला रस्त्यात भेटला. त्याचा स्वभाव विनोदी असल्याने त्याला जरा तुकारामची विकेट घेण्याची लहर आली.तो म्हणाला, काय शिंदे सर परवा रात्रीला जरा जास्तच ....अहो राजा तुम्ही एकदम सारखे डुलत..डुलत चालले होते. नंदीबैलाचीच चाल धरली होती तुम्ही.मला वाटलं की तुम्हाला पोहचून द्यावं लागते काय घरी.अहो जरा हिशोबा हिशोबानं घ्यायची नं राजेहो.असं म्हणून तो हसायला लागला. पण आमचा संत तुकाराम मात्र एकदम रागानं लालं झाला.त्याच्या डोळ्यातून अंगार फुलत होता अन् ओठ थरथर हालत होते. त्याने त्या अवस्थेत बोलायला सुरुवात केली, तुम्हाला काय वाटते त्या रात्री मी पिलो होतो. तुम्हाला काय माहीत आहे त्या रात्री मी किती टेंशनमध्ये होतो? कोणाचे काय प्राब्लेम असतात तुम्हाला काय माहीत आहे हो? अन् एक गोष्ट लक्षात घ्या, मी आतापर्यंत चार माणसांना ठोकून काढलं आहे. ते कोणत्या पदावर आहेत. कोणत्या जातीचे आहेत. याचा विचार केला नाही. आपलं कोणीच काही वाकडं केलं नाही. करू शकणार नाही अन् आपल्याला त्याचा काहीच पश्चाताप नाही. तो मित्र थोडा सावध झाला आणि म्हणाला, अहो, शिंदे सर मी थोडी मजाक केली हो तुमची. आपण नेहमीच असं बोलतो राजेहो. पण आज तुम्ही एवढं गरम होण्याचं कारण काय? तुम्ही तर अप्रत्यक्ष इशाराच दिला तुम्ही मलाही मारु शकता म्हणून.

परत आमचा तुकाराम, मी काहीही करु शकतो. त्या लोकांना मारल्याबद्दल मला पश्चाताप नाही. आणखी कोणी माझ्या चपक्यात आला तर त्यालाही सोडणार नाही. तो त्याचा मित्र काहीही न बोलता निघून गेला. मीही थोडा वेळ स्तब्ध झालो. त्याचा रौद्र अवतार पाहून या संत साहित्याच्या अभ्यासकात किती संयम आहे? याचा मलाही चांगलाच अंदाज आला होता. त्या त्रयस्थ व्यक्तीने घेतलेली त्याची विकेट योग्य होती असे मला मुळीच म्हणायचे नाही, पण त्याला थोडे विनोदाने मिश्कील उत्तर देता आले असते, होय मित्रा त्या अगोदर दोन वेळा रात्री मी तुला घरी पोहचविले होते. त्यावेळेस तर तुला तुझ्या घराचा रस्ताच सापडत नव्हता. त्या उपकाराची तू एकदा परतफेड केली म्हणजे काय झाले? माझा मित्र म्हणून तुझे ते कर्तव्यच आहे. मला वाटते विनोदी साहित्याच्या अभ्यासाने ही समज त्या व्यक्तीत येते. संत साहित्याचा अभ्यास तर अफाट आहे. तिथे संयम, शांतता, सहृदयता, मानवता, पशूपक्षी प्रेम, पर्यावरण प्रेम ह्या सर्व गोष्टींचा संगम आहे. त्या साहित्याविषयी लिहिताना अनेक थोर लेखकांची लेखणी तोकडी पडली आणि भविष्यातही तेच उत्तर असणार आहे. माझे संत साहित्याचे ज्ञान अफाट आहे. तेवढे अन्य कुणाचेच नाही आणि इतर ज्ञान कसे बकवास आहे.या 'मेरी मुर्गी...' प्रवृत्तीचे काय करावे?

इथे प्रामुख्याने आपल्याला एका गोष्टीचा विचार करावा लागतो तो हा की माझ्याजवळचे ज्ञान हे खूप अफाट आहे व इतर लोक कसे कवडीमोलं आहेत.हा अंहकार त्या ज्ञानी व्यक्तीची माती करतो. आमच्या प्रिय तुकाराम शिंदेची तीच अवस्था झाली. या लेखाच्या प्रारंभी पुरंदरे आणि पु. लं. च्या जीवनातील मिश्कील प्रसंग नमूद करण्याची मला त्यामुळेच आवश्यक्ता वाटली. जीवनातील अनेक प्रसंग असेच तेवढ्याच सहजतेने घ्यायचे असतात.त्यावर फारसे भाष्य करत बसण्यापेक्षा त्याला उत्तर म्हणून थोडेसे मिश्कील हास्य पुरेसे असते. पण धूर्त माणसं त्याचं भांडवल करतात. कुटील लोकं त्याचा आधार घेवून षडयंत्र रचतात तर शिघ्रकोपी आपली मानसिकता बिघडवतात.काही कालावधीसाठी समोरच्यालाही ते मनस्ताप देतात, पण त्यांच्या त्या वर्तनामुळे त्यांच्यापासून हळूहळू माणसे दूर जातात. ते मागे वळून पहातात. तेंव्हा त्यांच्यामागे कुणीच नसते. जवळ असण्याचा तर प्रश्नच नाही.

विनोदी साहित्य आपल्याला क्रोधापासून दूर नेते. जीवनातले अनेक प्रश्न किती कृत्रिम असतात. आपण एखाद्या लहान प्रश्नाचे उदात्तीकरण करून तो प्रश्न वाढवलेला असतो. त्याचे भरणपोषण करुन त्याला मोठे स्वरुप देवून आपण त्या प्रश्नाच्या वारुळात जाऊन बसतो आणि दररोज भेटेल त्याला सांगत सुटतो, मला किती मुंग्या चावत आहेत ! अशा व्यक्तीनी आपल्या वर्तनाविषयी थोडे चिंतन केल्यास त्यालाचं त्याचे हसायला येईल. त्या क्षणापासून त्याचे दु:ख कमी व्हायला निश्चितच सुरुवात होईल.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२,

# आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन

आजचा दिवस म्हणजे २९ जुलै हा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक स्तरावर वाघांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे म्हणून सेंट पिटरर्सबर्ग येथे झालेल्या व्याघ्र परिषदेत २९ जुलै हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून घोषित करण्यात यावा असा ठराव मांडण्यात आला त्याला सर्व देशांनी अनुमोदन दिल्याने हा दिवस जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. वाघ हा जंगलाचा राजा आहे. जंगलातील त्याची निर्धास्त चाल गगनभेदी डरकाळी या त्याच्या गुण वैशिष्ट्यामुळे वाघ हा सर्वांना आकर्षित करणारा प्राणी आहे. जगभरात कोणत्याही अभयारण्यात, जंगलातील सफरीवर गेलेल्या पर्यटकांचे पहिले आकर्षण वाघ दिसण्याचे असते. भारतीय संस्कृतीत तर वाघाला आदरयुक्त भीतीचे स्थान आहे. वाघाला जंगलाचा राजा असे संबोधले जाते. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी असून जनमानसात शौर्य, राजबिंडेपणा, सौंदर्याचे, राकटतेचे प्रतीक आहे म्हणूनच हिंदू संस्कृतीत वाघ पार्वतीचा अवतार असलेली देवी महिषासुरमर्दिनीचे व तिच्या अनेक रूपांचे वाहन बनले आहे. वाघ आणि आदिवासी जमातींचा हजारो



वर्षांचा संबंध आहे. आदिवासी जमातीत वाघाला देव मानतात. वाघांचा कोप होऊ नये म्हणून ते वाघाला देव मानून त्याची पूजा करतात. वाघांच्या अनेक जाती आहेत. भारतातील पट्टेरी वाघ जगातील वैशिष्ट्यपूर्ण प्राण्यांपैकी एक मानला जातो. भारत हे वाघांचे माहेरघर मानले जाते. भारताप्रमाणेच आशिया व आफ्रिका खंडातील इतर देशातही वाघांचे अस्तित्व आढळते. पूर्वी वाघांची संख्या खूप होती परंतु मधल्या काळात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली. केवळ भारतातच नाही तर जगभरात वाघांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. खेळ, मनोरंजन आणि वाढत्या लोकसंख्येमुळे वाघांच्या आधीवासावर होणारे मानवी अतिक्रमण तसेच वाघांच्या अवयवांची तस्करी करण्यासाठी केली जाणारी शिकार यामुळे दिवसेंदिवस वाघांचे प्रमाण कमी होऊ लागले. वाघांचे प्रमाण इतके कमी झाले की एकेदिवशी वाघांची डरकाळी लुप्त होईल की काय अशी भीती निर्माण झाली. ही भीती अनाठायी नाही. कारण गेल्या काही वर्षात वाघांच्या शिकारीच्या अनेक घटना आपल्या देशात घडल्या आहेत. चार वर्षांपूर्वी झालेल्या अवनी वाघिणीची शिकार कोण विसरेल? अवनी वाघिणीची शिकार झाल्यावर संपूर्ण देश हळहळला होता. अवनी प्रमाणेच गोव्यातही दोन वाघिणींची शिकार करण्यात आली होती. मागील चार वर्षात अनेक वाघांचे मृतदेह वनविभागाला आढळून आले आहेत. वाघ कमी होणे ही धोकादायक बाब आहे कारण जंगलात वाघ असणे हे समृद्ध जंगलाचे लक्षण समजले जाते. जंगलात असलेल्या अन्न साखळीत वाघ हा प्रमुख घटक समजला जातो. वाघांमुळे जंगलातील तृणभक्षी प्राणी व वनस्पती यांच्यात समतोल राखला जातो. वाघ नसतील तर जंगलात तृणभक्षी प्राण्यांची संख्या अमर्याद वाढेल व इतर निसर्गसंपदेवर या गोष्टीचा ताण पडेल परिणामी निसर्गचक्रच बिघडून जाईल. वाघ जंगलात असणे हे जंगलाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. वाघ असलेल्या जंगलात साधे लाकडूतोड करणारे व जंगलावर अवलंबून असणारव लोक भीतीपोटी जंगलात जात नाही त्यामुळे जंगलेही सुरक्षित राहतात. वाघ नाहीसे झाले की जंगलही नाहीसे होतील आणि जंगले नाहीसे झाल्यास निसर्गचक्रच बिघडून जाईल आणि त्याचे दुष्परिणाम केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागतील. तसे होऊ द्यायचे नसेल तर वाघांचे अस्तित्व टिकवले पाहिजे. आज या आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने वाघांचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घ्यायला हवी.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि, पुणे
मो. ९९२२५४६२९५

# 'दूष्ट विचारांचे सामर्थ्य अल्पजीवी'

जो समाजामध्ये वाईट विचार पसरतो. त्यांच्या बाजूने समाज कधी ही उभा राहू शकत नाही. ज्यांचे विचार सडलेले आहेत. ते व्यक्ती दूष्ट असतात. सकाळी सकाळी वाईट प्रवृत्तीच्या लोकांची तोंडी पाहू नयेत.

असा समाजामध्ये समज आहे. सामाजिक प्रतिष्ठा मिळण्यासाठी चांगले कर्तृत्व करावे लागतात. दुष्ट विचार मनामध्ये सतत चालू राहिले तर मनुष्य समाजातून वाळीत पडतो. दुष्ट विचार करणाऱ्या लोकांचे कधी ही कुठेही मंदिर, स्मारक, पुतळा, छत्री बांधलेले नाही. नेहमी त्याची समाजात अवहेलना,चेष्टा टिंगल- टवाळी, मस्करी केली जाते. चित्रपटातील खलनायक सुरुवातीला वाईट कृत्य करतो आणि काही वेळानंतर फासे उलटे फिरतात आणि तुरुंगात जाऊन खडी फोडत बसतो. त्याची कर्म त्याला फेडावी लागतात. त्याची दुष्ट विचार त्याच्याच भोवती फिरतात आणि त्यांचे वाईट विचाराचे सामर्थ्य अल्पजीवी टिकते. म्हणून माणसाने दीर्घकालीन आपले नाव कसे समाजात सुगंधा प्रमाणे पसरत राहील, यासाठी उत्तमोत्तम कार्य करावे. त्यासाठीच हा लेखन प्रपंच...

माणूस हा स्वतःच्या शरीराची जशी काळजी घेतो, तसेच त्यांनी मनाची सुद्धा काळजी घ्यावी. विचार चांगले ठेवावेत.विचाराची शुद्धता फार महत्त्वाची आहे. जसे आपण शरीराची काळजी घेऊन मनाची जोपासना करतो, जो पर्यत बुद्धी व आत्म्याचा विकास करण्याचा प्रयत्न आपण करत नाही.तो पर्यंत प्रगती होत नाही.विवेक जागृतीच्या बरोबरीने भौतिक व आध्यात्मिक प्रगती करावयाची असते. त्यामुळे आपणास स्वतःच्या पलीकडे पाहता येते, हे आपले ध्येय असावे. सशक्त समाजाची व राष्ट्राची निर्मिती सशक्त व्यक्ती पासूनच होऊ शकते. त्यासाठी प्रत्येकाने आपले मन साफ ठेवले पाहिजे. स्वतःचे कल्याण साधून घ्यावे व दुसऱ्याला सुद्धा कल्याण साधण्यासाठी वेळ द्यावा.योग्य वेळी मदत करावी.असे चांगले विचार असणे गरजेचे आहे.

मनात दुष्टचक्र नको, अनेक लोकांच्या मनात दुर्गंधी युक्त विचार असतात.आपले विचार वाईट असतील तर सर्वच वाईट होते. म्हणून आपले विचार कायम स्वरूपी चांगले ठेवावेत.ज्यांचे चांगले विचार आहेत,त्या महात्म्याचे आज सुद्धा एका दिवसात तीन वेळेस लोक नाव काढतात.ज्यांचे वाईट विचार आहेत. त्यांना लोक नेहमी दूषणे देतात.म्हणून आपल्या विचारां मध्ये मानवता,सत्यता,सचोटी पणा,प्रामाणिकपणा,दया,क्षमा, शांती,करुणा,परोपकार वृत्ती, सामंजस्यपणा,सभ्यता या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मतभेदाची लढाई असावी,मनभेदाची लढाई नसावी.एखादा व्यक्ती आपल्या पुढे जात असेल तर काही हरकत नाही. आपणही पुढे जाण्यासाठी रात्रंदिवस तेवढे परिश्रम करावेत.

आपल्या विचारांना परिश्रमाची जोड द्यावी ती कृतीत उतरावी. वाचावीर होऊ नये,कृतीवीर व्हावे, तेव्हा तुमच्या चांगल्या विचाराला तलवारीची धार येते. तलवारीने झालेली जखम पुसली जाऊ शकते; परंतु चुकीच्या विचाराने झालेली मनाची जखम कधीही आपण पुसू शकत नाही. हे खरे आहे. ज्ञानी व्यक्तीनी ज्ञानवंत व्हावे,आणि इतरांना भरभरून ज्ञान द्यावे, बागेने फुले द्यावीत, नदीनी पाणी द्यावे,शिक्षकांनी विद्यार्थ्याला अद्यावत ज्ञान द्यावे, व्यापाऱ्यांनी आपल्या वस्तूची लोकांना शुद्धता द्यावी. सैनिकांनी समाजाला सुरक्षितता द्यावी, शेतकऱ्यांनी रयतेला अन्नधान्य द्यावे, मुलांनी आई-वडिलांना आधार द्यावा, निराधार करू नये.महिलांचा नेहमी सन्मान करावा, विद्यार्थ्यांनी गुरुचा आदर करावा. स्नुशांनी आपल्या आई-वडिलाप्रमाणे सासू-सासऱ्यांचाही आदर करावा. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना योग्य तो मान सन्मान द्यावा, चुकल्यास एकांतात बोलून त्यांना समज द्यावी. हे सोन्यासारखे शब्द ऐकून माणसाच्या मनाची शुद्धता वाढते,आपले शब्द नेहमी सुगंधीत,सुवासिक अत्तर तेला प्रमाणे असावेत,साधू संतांची विचारधारा जोपासावी. त्यांच्या समाज प्रबोधन विचारांची पेरणी व्हावी.गुंड प्रवृत्तीच्या लोकांपासून दूर राहावे,त्यांचे विचार खालच्या दर्जाचे असतात. त्यामुळे त्यांचे सामर्थ्य अल्पजीवी टिकते.

अनेक व्यक्ती सुद्धा वाईट विचारांनी लोप पावले आहेत. दिसायला चांगली व्यक्ती जरी असली तरी त्यांचे विचार दुष्ट व फसवे आहेत. पुतना मावशींनी श्रीकृष्णाला फसवण्याचा प्रयत्न केली आणि स्वतः नष्ट झाली.

वाकून नमस्कार करणे, तुमचीच आठवण काढत होतो,असे म्हणणे, तुम्ही नसल्या नंतर आमचे काय होईल ? तुमच्यामुळे आम्ही सुखाचे दोन घास खातो,असे बोलणे हे सगळे ठकपणाची व स्वार्थीपणा साधण्याची अदृश्य लक्षणे आहेत. देखल्या देवा दंडवत म्हणून प्रत्यक्ष दिसणाऱ्या माणसांची दाढी कुरवाळयची आणि दूर गेल्यास टोमणे मारायचे हे चांगले नाही. म्हणून मानवांनी सदगुणाची पेरणी करावी. कर्तृत्वान माणसांचा आदर करावा. देशाबद्दल नेहमी निष्ठा बाळगावी. अशा चांगल्या विचारांची नेहमी मानवाने सर्वच ठिकाणी पेरणी करावी. तेव्हाच समाज सुसंस्कृत होईल. समाजामध्ये नवचैतन्य निर्माण होईल.असे अमृतवाणी शब्द ऐकून अनेक जणांच्या मनाला ते भावस्पर्श करतात. यालाच चांगल्या विचाराचा सुगंध म्हणतात. पण आज विचाराची दुर्गंधी अनेक ठिकाणी चालू झाली आहे.प्रत्येक गोष्टीमध्ये भ्रष्टाचार कसा करता येईल,असे अनेक जण म्हणत आहेत.यामध्ये जवळ जवळ अशिक्षित पेक्षा सुशिक्षित लोकांचा भरणा जास्ती जास्त आहे. ते ही खालच्या दर्जाचे विचार करत आहेत. न्यायदान प्रक्रियेमध्ये सुद्धा लाच घेतली जात आहेत. त्या घटना सध्या अनेक ठिकाणी राजरोसपणे घडत आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारात दुर्गंधी पसरली आहे. अशी दुर्गंधी जर वाढत राहिली तर समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडेल.आज कोणत्याही क्षेत्रावर पूर्णपणे विश्वास राहिला नाही. समाजा-समाजामध्ये एकवाक्यता राहिली नाही.गटतट निर्माण झाले आहेत. काही दुराचारी,अति स्वाभिमानी लोक वेगवेगळे झेंडे हातामध्ये घेऊन सामाजिक एकात्मता बिघडून टाकत आहेत. अल्पसंख्याक समाजाचा विचार करत नाहीत. त्यामुळे तो समाज पतंगाच्या दोरी तुटल्यासारखा भरकटत आहे.अनेक अल्पसंतुष्ट लोक कसलाही विचार न करता परिपूर्ण अभ्यास नसलेले लोक ऊठसूट घोषणा देत आहेत. त्यामुळे अनेक लोकांचे विचार चांगले असूनही काही मोजक्या लोंकामुळे त्यांच्यातील वाईट विचारांची दुर्गंधी सुटली आहे. असेच जर होत राहिले तर या देशाचे काय होईल? पण आपल्या आयुष्यात कधी कधी असे काही क्षण येतात.तेव्हा सर्व आपल्या आशा मावळतात. सर्वत्र काळाकुट्ट अंधार दाटून येतो. पण याच काळात कसोटीच्या क्षणांमध्ये काही माणसे एखाद्या दीपस्तंभ सारखे उभे राहतात. कारण त्यांच्या विचाराला कृतीची जोड असते. त्यामुळे ते प्रकाशमान होतात. त्यांचा प्रकाश इतरांवरही पडतो. त्यामुळे ते उजळून निघतात. त्यामुळे संत कबीर म्हणतात ऐसी बात कहीए श्र कोई ना बोले झूठ श्र ऐसी जगह बैठीए कोई ना बोले ऊठ श्रश्र त्यामुळे चांगल्या व्यक्तीच्या संगतीला रहा व सावलीला बसा. आणि आपल्या जीवनाचा उत्कर्ष करून घ्या, शेतीत बाजरीची पेरणी करुन गहू उगवण्याची अपेक्षा धरू नका. याचा अर्थ वाईट कृत्य करून सदगुणाची अपेक्षा मनात बाळगू नका? हे या ठिकाणी आजच्या तरुणांना आवर्जून सांगावे वाटते. पूर्ण पुरावे हाती आल्याशिवाय बाष्फळ बडबड करू नका. नाही तर सबळ पुराव्या अभावी अट्टल गुन्हेगार तुरुंगातून सुटतात व आपली नाचक्की होते.म्हणूनच दृष्ट व्यक्तींचे विचार चक्र नेहमी अल्पजीवी ठरते.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष: विठूमाऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता. मुखेड, जि. नांदेड

## थोडक्यात...

### आय.आय.पी.ए.च्या नांदेड शाखा कोषाध्यक्षपदी प्रा.डॉ.दीपक वाघमारे

**नांदेड (प्रतिनिधी)–** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या नांदेड कोषाध्यक्षपदी



प्रा.डॉ. दीपक वाघमारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्य करणाऱ्या महत्वपूर्ण संस्थेत प्रा.डॉ. दीपक वाघमारे यांना संधी प्राप्त झाल्याबदल प्रतिभा निकेतन शिक्षण संस्थेचे विश्वस्त शंतनू डोईफोडे यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर, उपप्राचार्य डॉ. दिलीप स्वामी, प्रा. डॉ. एस. व्ही. शिंदे, डॉ. रविंद्र लाठकर, डॉ. संजय हपगुंडे, डॉ. श्रीमंत राऊत, डॉ. श्रीकांत केंद्रे, डॉ.राजेश चालीकवार, डॉ.मेघा पाठक, डॉ.भालचंद्र धर्मापुरीकर, प्रा.प्रवीण स्वामी, डॉ. ममता देशमुख कार्यालय अधीक्षक राजेश अयंगार व सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### महाराष्ट्र ऑटो आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या सभासद नोंदणीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हातील सर्व रिक्षाचालक आणि टॅक्सी चालक संघटना तसेच रिक्षाचालक आणि टॅक्सी चालक यांनी महाराष्ट्र ऑटो आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या सभासद नोंदणीसाठी या लिंकवर https://ananddighekalyankarimandal.org ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत ककरेज यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळवावे -डीवायएसपी नायक

## सिख वेलफेअर असोसिएशनतर्फे गुणवंत विद्यार्थी व वरिष्ठ नागरिक सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्पर्धा परीक्षा हे जनसेवेचे एक प्रभावी माध्यम आहे. एमपीएससी, यूपीएससी किंवा समकक्ष परीक्षांविषयी विद्यार्थी भिती बाळगतात. अशा परीक्षांमध्ये साधारण ६० टक्के घेणारा विद्यार्थी देखील यश संपादित करू शकतो. म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासासोबतच स्पर्धा परिक्षेची तयारी करुन यश संपादित करावे, असे प्रतिपादन नांदेड शहराचे उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार नायक यांनी केले. ते सिख वेलफेअर असोसिएशनतर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थी आणि वरिष्ठ नागरिक सत्कार कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून बोलत होते.




यावेळी कार्यक्रमात गुरुद्वारा तख्त सचखंडचे सहायक जत्थेदार संतबाबा रामसिंघजी, गुरुद्वारा श्री लंगरसहिबचे मुखी संतबाबा बलविंदरसिंघजी करसेवावाले, प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किशोर गंगाखेडकर, सिख वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष स. लड्डूसिंघ महाजन, उपाध्यक्ष स. इंदरजीतसिंघ संधू मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना सुशीलकुमार नायक म्हणाले की, मी मेकॅनिकल इंजिनियरींग विषयात अभियांत्रिकी पदवी मिळवल्या नंतर एखाद्या कंपनीमध्ये नौकरी मिळवली असती. पण जेव्हा स्पर्धा परीक्षाचा अभ्यासक्रम केला आणि त्याचे महत्व मला कळले, तेव्हा एमपीएससी परीक्षेत यश गाठले आणि सरळ डीवायएसपी पदावर रुजू झालो. पोलीस सेवेत आल्यानंतर जनतेची सेवा करण्याची मला संधी लाभली. सिविल सर्विसेस मध्ये काम करण्याची तयारी प्रत्येक विद्यार्थ्यांनी करावी असे माझे व्यक्तिगत मत आहे. सिख वेलफेअर असोसिएशन नांदेड संस्था शिक्षण आणि स्वस्थ्य सेवेत मोठे योगदान देत आहे. सर्व पदाधिकारी आणी सदस्य कौतुकास पात्र आहेत असे, ही ते म्हणाले.

प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर यांनी पालक आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व सांगितले. ते म्हणाले की, शिक्षण आत्मसात करतेवेळी चारित्र्य निर्माण करणेही तेवढ्याच महत्वाचे ठरते. शरीराला एखादे आवरण घालून ढाकता येते. परंतु मनाची सुंदरताहीच खरी सुंदरता आहे. आपले व्यक्तिमत्व इतरांना आवडलं पाहिजे असेही ते म्हणाले. कार्यक्रमात ८० वय गाठणाऱ्या सिख समाजातील वरिष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आले. तसेच दहावी आणि बारावी परीक्षेत गुणवंत ठरलेल्या जवळपास शंभर विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लड्डूसिंघ महाजन यांनी केले तर सूत्रसंचालन रविन्द्रसिंघ मोदी यांनी आणि आभार प्रदर्शन नारायणसिंघ नंबरदार यांनी केले.

कार्यक्रमात माजी महापौर बलवंतसिंघ गाडीवाले, गुरचरनसिंघ घडीसाज, सुरजीतसिंघ खालसा, अर्जुनसिंघ मुनीम, लालसिंघ त्रिकुटवाले, संतसिंघ संधू, शेरसिंघ तबेलेवाले, रतनसिंघ त्रिकुटवाले, स. जसपालसिंघ नागपुरवाले, मुख्याध्यापक चाँदसिंघ, श्रीमती अनिलकौर खालसासह मोठ्या संख्येत नागरिक, विद्यार्थी आणी पालक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर लंगर कार्यक्रम पार पडले.

# एमपीएससी लिपिक टंकलेखक पदभरतीचा मार्ग मोकळा

## आ. हेमंत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा अयोग यांच्यामार्फत २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या लिपिक टंकलेखक पदभरतीचा अंतिम निकाल व निवड यादी आयोगाकडून मागील २ वर्षांपासून प्रलंबित होती. अखेर आ. हेमंत पाटील यांच्या पाठपुराव्याने दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पदभरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. नुकतीच या भरती प्रक्रियेची अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामुळे राज्यभरातील ७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना न्याय मिळाला असून त्यांचा पदभरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. आ. हेमंत पाटील यांनी सातत्याने या प्रश्नाचा पाठपुरावा करून नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता.



एमपीएससीकडून ३० एप्रिल २०२३ रोजी लिपिक टंकलेखक या पदाची पूर्व व १७ डिसेंबर २०२३ रोजी मुख्य परीक्षा घेण्यात आली होती. तब्बल २ वर्षांपासून या पदाचा अंतिम निकाल व निवड यादी प्रलंबित होती. त्यामुळे दोन्ही परीक्षा देऊनही पात्र विद्यार्थी अंतिम निकालाची वाट पाहत होती. या संदर्भात राज्यभरातून विद्यार्थ्यांनी आयोगाला लेखी, मेलद्वारे पत्र व्यवहार करून सुद्धा दखल घेण्यात आली नसल्याने पात्र विद्यार्थी हतबल झाले होते. यादरम्यान नांदेड जिल्ह्यातील १०० च्या वर विद्यार्थ्यांनी मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आ. हेमंत पाटील यांची भेट घेऊन आपली व्यथा व्यक्त केली होती. आ. हेमंत पाटील यांनी विद्यार्थ्यांना आश्वासित करून हा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात येईल असे सांगितले होते. त्यानंतर केवळ एक महिन्याच्या कालावधीत यावर तोडगा काढत भरतीचा मार्ग मोकळा करण्यास पाठपुरावा केला. नुकत्याच झालेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेमध्ये प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर आयोगाने आ. हेमंत पाटील यांच्या मागणीची दखल घेऊन दि. ११ जुलै रोजी अंतिम निवड यादी प्रसिद्ध केली. आ. हेमंत पाटील सातत्याने केलेल्या मागणीला यश आले असून यामुळे राज्यभरातील ७ हजारांच्या वर विद्यार्थ्यांचा लिपिक टंकलेखक पदभरतीचा मार्ग मोकळा झाला असून लवकरच आयोगाकडून पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात येणार आहेत.

नांदेड जिल्ह्यासह राज्यभरातील सर्व पात्र विद्यार्थी लिपिक टंकलेखक परीक्षेच्या अंतिम निकालाची आतुरतेने वाट पाहत होते. सर्वांचे डोळे अंतिम निकाल व निवड यादीकडे लागून होते. याबाबत आम्ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सातत्याने पाठपुरावा पत्र व मेलद्वारे करत होते. पण प्रत्येकवेळी पदरात निराशा पडत होती, अखेर आ. हेमंत पाटील यांनी आमच्या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन त्याचा पाठपुरावा केल्यामुळे निकाल जाहीर करून अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. यामुळे नांदेड जिल्ह्यातील १०० च्यावर विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होणार आहे.

# नांदेड–पूर्णा रस्त्यावर कार दुचाकीचा अपघात; परभणीचे दोघेजण ठार; एक जण गंभीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड ते पूर्णा रस्त्यावर भानपुर पाटीजवळ एका कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीवरील तीन जणांपैकी दोघेजण जागीच ठार झाले असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना रविवारी सायंकाळी घडली. जखमींवर विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मयत व जखमी परभणीचे रहिवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

नांदेडहून परभणीकडे दुचाकीवरून (एमएच १४ एचआय-९९२६) जाणाऱ्या तिघांना समोरून येणाऱ्या एका कारने (एमएच २६ बीएक्स-६८१२) जोराची धडक दिली. या धडकेत दोघेजण जागीच ठार झाले तर एक जण गंभीर जखमी झाला. या अपघातात दुचाकीचा चुराडा झाला आहे. घटनास्थळी भाग्यनगर आणि लिंबगाव ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी धाव घेतली. तात्काळ जखमींना विष्णुपुरीच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. मयतामध्ये बंटी शिरसे व ओम अंभोरे तर जखमीमध्ये वैभव अंभोरे




यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले. अपघातानंतर कारचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून अपघातानंतर परिसरातील ग्रामस्थांची घटनास्थळावर मोठी गर्दी जमली होती.

# गोवर्धन घाट तसेच नवीन पुलावर आत्महत्या व निर्माल्य केरकचरा रोखण्यासाठी लोखंडी संरक्षण जाळी बसविण्याच्या कामाचा शुभारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील गोदावरी नदीवरील पुलावरून उड्या मारून होणाऱ्या आत्महत्या व गोदावरी नदीत विविध सण उत्सव काळात फेकण्यात येणाऱ्या निर्माल्य, केरकचरा रोखण्यासाठी गोवर्धन घाट व नवीन पुलाच्या नदी पुलाच्या कठड्यावर दोन्ही बाजुंनी दहा फूट उंच संरक्षण जाळी बसविण्याचा कामांचा शुभारंभ नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या उपस्थितीत दि. २८ जुलै रोजी गोवर्धन पूल येथे करण्यात आला.



नांदेड येथील गोदावरी नदीच्या गोवर्धन घाट व जुना मोंढा पुलावरून उडी मारून आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले होते. तसेच दोन्ही पुलावरून विविध सण उत्सव निमित्ताने होणारे निर्माल्य, केरकचरा टाकण्याचे प्रमाणही वाढत गेल्याने नांदेड मनपाचे आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी नांदेड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत गेल्या तीन वर्षांपूर्वी संरक्षक लोखंडी जाळी बसविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. त्यांच्या सतत पाठपुराव्यामुळे या कामासाठी १ कोटी ३५ लक्ष रूपयांचा निधी जाहीर झाला होता. त्यानंतर गोवर्धन घाटावरील जाणे-येणे, दोन बाजुंनी बाजुंनी दहा फुट ऊंच लोखंडी जाळी बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

या कामाचा शुभारंभ नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आ.आनंदराव पाटील बोंढारकर, माजी नगरसेवक राजू पाटील काळे, शाम पाटील वानखेडे, चांदोजी वाघमारे, कनिष्ठ अभियंता किरण सुर्यवंशी, गुत्तेदार प्रविण नंदला, पैलवान रामेश्वर काळे यांच्यासह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील काम दोन महिन्यांत पूर्ण होणार आहे.

# शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा




**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना जिल्हा शाखा नांदेडच्यावतीने शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.

जून ते २७ जुलैदरम्यान वृक्षारोपण व संवर्धन या उपक्रमा अंतर्गत शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माणिकनगर, राजीव गांधी प्राथमिक विद्यालय नागार्जुनानगर येथे राज्य उपाध्यक्ष विठ्ठल चव्हाण, जिल्हा समन्वयक तथा राज्य उपाध्यक्ष दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वड, पिंपळ, करंजी, चिंच, बेहडा, गुलमोहर या वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष तानाजी पवार, शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, जिल्हा सरचिटणीस रवींद्र बंडेवार, जिल्हा कोषाध्यक्ष गंगाधर कदम, जिल्हाउपाध्यक्ष सचिन पाटील गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष मंगेश पवार, मुख्याध्यापक सुधीर कुरूडे, उपमुख्याध्यापक नळगे, पर्यवेक्षक एस. एम.पारेकर, पर्यवेक्षक आर. सी. गायकवाड, डी. एस. देवकत्ते, मंगेश पाटील, सचिन कळसे यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी ज्येष्ठ नागरिक संघटनेची सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी ज्येष्ठ नागरिक संघटनेची सर्वसाधारण सभा दि. २६ जुलै रोजी विजयनगर हनुमान मंदिर कार्यालय येथे संघटनेचे अध्यक्ष द.मा. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महेश लक्ष्मणराव देशमुख (उप मुख्य लेखा वित्त अधिकारी, जि.प. नांदेड), विक्रम देशमुख (जिल्हा कोषागार अधिकारी नांदेड), निळकंठ पांचगे (लेखा अधिकारी शिक्षण विभाग नांदेड), आणि नामदेव शंकरराव राठोड (अप्पर कोषागार अधिकारी) उपस्थित होते.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे अध्यक्ष पी.जी. मिसाळे, एल.एच. लंके, अशोक गंगाधरराव पवळे, सटवाजी चौरे, रेणुदास बेहरे व सखाराम घुले यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विशेष सत्कारात मीराखान यांना जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल गौरविण्यात आले, तर चंद्रकांत जटाळ व रेणुकादास बेहरे यांना निवृत्ती पुरस्कार, तसेच माणिक गोमटे यांना महाराष्ट्र शासनाचा लेखा पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. सभासद संख्या वाढविण्यासाठी योगदान दिल्याबद्दल सादिक टेंभुर्णीकर व सुधाकर दुधारे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी अध्यक्ष द.मा. रेड्डी यांनी प्रास्ताविक केले. सचिव चंद्रकांत जटाळ यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचले, तर कोषाध्यक्ष सुरेश चौधरी यांनी मागील वर्षाचा जमा-खर्च अहवाल सादर केला.




**नांदेड :** अखिल भारतीय क्षत्रिय महासभेच्यावतीने भारतातील पहिलेच विधुर-विरांगणा (विधवा), घटस्फोटीत यांच्या पुनर्विवाह परिचय मेळावा नाशिक येथे पार पडला. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष ठाकूर महेंद्रसिंह तंवर, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा आयोजक राजेंद्रसिंह चौहान, राष्ट्रीय अध्यक्ष डिंपल राणा, राष्ट्रीय संयोजक सैनिक विभाग कॅप्टन जे.पी. चौहान, राष्ट्रीय उपाध्यक्ष डी.पी. सिंह, प्रदेशाध्यक्ष नवनिर्वाचित महिला प्रदेशाध्यक्ष चंद्रकला सिसोदिया, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. पुनितासिंह रावत, जसपालसिंह सिसोदिया, ॲड. आनंदसिंह बैस, अजयसिंह शेंगर, पवनसिंह बेस, सौ. शिला बैस आदी. (छाया : करणसिंह बैस)

### रामतीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्रात १७ महिलांवर कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** रामतीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्रात नुकतेच १७ महिलांवर कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आली.

रामतीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ. डोंगरे यांच्या प्रयत्नामुळे दोन वर्षांत जवळपास १२० महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. बिलोली तालुक्यातील रामतीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. डोंगरे यांच्या टीमने परिसरातील कुटुंब नियोजनाचे महत्त्व सांगत गत दोन वर्षापासून जवळपास १२० महिलेवर कुटुंब नियोजनाची यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे. त्याच अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी डॉ.मुनेश्वर यांनी रामतीर्थ प्राथमिक केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसह आरोग्यसेविका सिमा वडपत्रे, गोदावरी चौधरी व औषध निर्माण अधिकारी यांच्या सहकार्याने दि. २० जुलै १७ महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया पूर्ण केली आहे.

# परिस्थिती यशाच्या आड येत नाही -प्रणिताताई देवरे चिखलीकर

## आ.चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त लोह्यात गुणवंतांचा सत्कार

**लोहा (प्रतिनिधी)–** यशाला शॉर्टकट कधीच नसतो. परिश्रम करा अभ्यासात सातत्य असले पाहिजे. परिस्थिती ही यशाच्या आड येत नाही. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी अपडेट असावे लागते. मोबाईलचा वापर शक्यतो टाळला पाहिजे, आज वाचनाची गरज आहे, तरच आपणास स्पर्धेत यश मिळविता येईल, असे प्रतिपादन प्रणिताताई देवरे चिखलीकर यांनी केले.



कालवश संभाजीराव धुतमल प्रतिष्ठाण आणि जिज्ञासा अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्यावतीने आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त दहावी-बारावी बोर्ड परीक्षा व एकल पालक विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, प्रा.डॉ.डी.एम पवार, हरीभाऊ चव्हाण, शोभाताई बगडे-नळगे, माजी कृउबा उपसभापती मारोती पाटील बोरगावकर, आयोजक उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, माजी नगरसेवक करीम शेख, पंचशील कांबळे, भास्कर पाटील पवार, बी.डी. जाधव, रत्नाकर महाबळे, इमाम लदाफ, डी.एम.काहळेकर, बी.डी. जाधव, बुद्धभूषण खिल्लारे, भानुदास पाटील यांची उपस्थिती होती.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एकल पालक विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप कारण्यात आले. दहावी बारावी बोर्ड परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यप्रसंगी प्रा डॉ.धनंजय पवार, माजी नगरसेविका शोभाताई बगडे-नळगे, भास्कर पाटील पवार, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक काशीनाथ शिरसिकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. होतकरू व गरजवंत विद्यार्थ्यांला दहावीनंतर दोन वर्षे शिक्षणासाठी शैक्षणिक आर्थिक मदत करणारे पत्रकार एकनाथ तिडके, तसेच रुग्ण सेवा समितीवर सदस्य म्हणून नियुक्त झालेले मारोती पाटील यांचा प्रणिताताई देवरे यांच्या हस्ते सत्कार कारण्यात आला. आयोजक छत्रपती धुतमल, प्रवीण धुतमल, रत्नाकर महाबळे, ओमपुरी, बालाजी धनसडे, गजले, अक्षय जोंधळे, तनय धुतमल यांनी मान्यवरांचा सत्कार केला.

अभ्यासिकेचे संस्थापक हरिहर धुतमल यांनी प्रास्ताविक केले. संचलन काशिनाथ शिरसिकर यांनी तर आभार रत्नाकर महाबळे यांनी मानले.

# आनंद कृष्णापूरकर यांचा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्काराने सन्मान




**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्राहक पंचायत महाराष्ट्राचा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार नांदेडचे जिल्हा संघटक आनंद कृष्णापूरकर यांना नुकताच धाराशिव येथे झालेल्या ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या राज्य अधिवेशनात राज्य सचिव अरुण वाघमारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी राज्य अध्यक्ष डॉ. विजय लाड, राज्य संघटक सर्जेराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा पुरस्कार मराठवाडा विभाग संघटक इंजि. बालाजी लांडगे, प्रा. हेमंत वडणे, राज्याध्यक्ष डॉ. विजय लाड यांच्या हस्ते देण्यात आला.

उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद कृष्णापूरकर यांचे येथील सिताराम मंदिर चिखलवाडी, नांदेड येथे ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा शाखा नांदेडच्या बैठकीत अभिनंदन व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन व आभार डॉ. सायन्ना मठ्ठमवार केले. सदरील बैठकीस रंगनाथ उंबरकर, ॲड. सुरेंद्र सिंग लोणीवाले, ॲड. दिपाली डोणगावकर, भागीरथी बच्चेवार, पुष्पा संगारेड्डीकर, बाळासाहेब पानसे इंजि. नागनाथ चिटकुलवार यांची उपस्थिती होती.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# कांद्यावरील करपा, फुलकिडींचे नियंत्रण

## काळा करपा (रोगकारक बुरशी)

- लक्षणे : सुरुवातीला पानाची बाह्य बाजू व बुडख्याजवळ राखाडी रंगाचे ठिपके दिसतात. त्यावर बारीक गोलाकार आणि उठावदार ठिपके वाढू लागतात. पाने वाळतात. रोपाची मान लांबट होऊन पात वेडीवाकडी होते. पाने वेडीवाकडी झाल्यामुळे कांद्याची वाढ होत नाही. रोपांची पाने ही काळी पडून वाळतात. नंतर रोप मरते. दमट आणि उबदार हवामानात रोगाच्या बुरशीची वाढ झपाट्याने होते. कुजलेल्या रोपाचा भाग, रोपवाटिकेतील रोप आणि कांदा या मार्फत हा रोग पसरतो.



- उपाय : गादीवाफ्यावर रोपवाटिका तयार करावी. लागवडीसाठी पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीची निवड करावी. पिकांची फेरपालट करावी. पुनर्लागवडीवेळी रोपे कार्बेन्डाझिम (०.१ टक्के) १ ग्रॅम या प्रमाणात द्रावणात बुडवून नंतर लागवड करावी.
- नियंत्रणासाठी फवारणी : प्रतिलिटर पाणी : मँकोझेब ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा मेटीराम (५५ टक्के) अधिक पायरॅक्लोस्ट्रोबीन (५ टक्के डब्ल्यूजी) (संयुक्त बुरशीनाशक) १ ग्रॅम - १० ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारणी करावी.

## तपकिरी करपा (रोगकारक बुरशी)

- लक्षणे : रोगाचा प्रादुर्भाव कांदा पिकावर तसेच बियाण्याच्या पिकावर होतो. पानाच्या बाहेरील भागावर पिवळसर, तपकिरी रंगाचे लांबट चट्टे दिसून येतात. चट्ट्यांचा आकार वाढत जाऊन पाने सुकू लागतात. फुलांच्या दांड्यावर प्रादुर्भाव झाल्यास दांडे मऊ होऊन वाकून मोडतात.
- नियंत्रण : फवारणी : प्रतिलिटर पाणी : मँकोझेब ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा हेक्झाकोनॅझोल १ मिलि किंवा क्लोरोथेरोनॉल २.५ ग्रॅम १० ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारणी करावी. पिकांची फेरपालट करावी.



## जांभळा करपा (रोगकारक बुरशी)

- लक्षणे : पिकाच्या कोणत्याही अवस्थेत या रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो. रोपवाटिका तसेच बीजोत्पादनाची लागवड तसेच रांगड्या कांद्यावरही या रोगाचा प्रादुर्भाव होतो. सुरुवातीस पानावर लांबट पांढुरके चट्टे पडतात. चट्ट्यांचा मध्यभाग आधी जांभळा व नंतर काळा पडतो. अनेक चट्टे एकमेकांत मिसळून पाने करपतात. रोपांच्या माना मऊ पडतात. फुलांचे दांडे मऊ पडून वाकतात किंवा मोडून पडतात.
- उपाय : पिकांची फेरपालट करावी.
- नियंत्रण : फवारणी : प्रतिलिटर पाणी : मँकोझेब ३ ग्रॅम किंवा क्लोरोथॅलोनॉल २.५ ग्रॅम अधिक स्टीकर. याप्रमाणे १० दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून फवारणी करावी.

## आयरिश यलो स्पॉट

- लक्षणे : या विषाणूजन्य रोगाचा प्रसार फुलकिड्यांमार्फत होतो. पानांवर, फुलांच्या दांड्यावर पिवळ्या रंगाचे ठिपके पडतात. ठिपक्याला गडद पिवळ्या रंगाची कडा तयार होते. अनेक ठिपके तयार होऊन संपूर्ण पान वाळते.
- उपाय : फुलकिड्यांचा बंदोबस्त करावा. पिकांची फेरपालट करावी. फुलकिड्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. शेतातील कुजलेला पालापाचोळा, प्रादुर्भावग्रस्त भाग नष्ट करावा.

## फुलकिडे, मावा

- लक्षणे : पिल्ले व प्रौढ कीटक पानांतील रस शोषून घेतात. रस शोषताना किडींनी असंख्य चावे घेतल्यामुळे पानांवर पांढुरके ठिपके पडतात. त्यालाच 'टाक्या' असे म्हणतात. किडीने केलेल्या जखमांतून काळा किंवा जांभळा करपा या रोगांच्या बुरशीचा पानांत शिरकाव होतो. करता येतो.
- उपाय : फवारणी : प्रति लिटर : प्रोपिनोफॉस १ मि.लि. किंवा फिप्रोनील १ मि.लि. कीटकनाशकांचा वापर १० ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून चिकटद्रव्यांसह करावा.

# खरिपातील भाजीपाला पिकांचे नियोजन





## मिरची

- पाण्याचा उत्तम निचरा होणारी, भारी ते मध्यम प्रकारची जमीन आवश्यक असते. खरीप पिकाची लागवड जून-जुलै महिन्यात, तसेच उशिरा ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत करतात.
- सुधारित जाती : अ) हिरव्या मिरचीसाठी - परभणी तेजस, ज्वाला, जी- ४, पंत सी.१, मुसळवाडी सिलेक्शन, फुले ज्योती, फुले मुक्ता.
- ब) लाल मिरचीसाठी - जी- ४, पुसा ज्वाला, एन- ५९ आदी.
- बियाण्याचे प्रमाण : रोपे तयार करण्यासाठी चांगली उगवणक्षमता असलेले, उत्कृष्ट दर्जाचे खात्रीशीर बियाणे वापरावे. हेक्टरी १ ते १.५ किलो बियाणे पुरेसे होते. पेरणीपूर्वी १ किलो बियाण्यास २ ते ३ ग्रॅम थायरम चोळावे.
- लागवड : मिरची लागवड सरी-वरंब्यावर करावी. उंच व पसरट रोपांची लागवड ६० × ६० सें. मी. अंतरावर व बुटक्या जातींची लागवड ६० × ४५ सें. मी. अंतरावर करावी. भारी जमिनीसाठी अंतर जास्त ठेवावे. लागवडीपूर्वी रोपे (विशेषतः पानाचा भाग) ५ मिनिटांसाठी पुढील द्रावणामध्ये बुडवून काढावीत. क्लोरपायरिफॉस १२ मि.लि. अधिक मॅन्कोझेब २५ ग्रॅम अधिक पाण्यात मिसळणारे गंधक ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी. (अॅग्रेस्को शिफारस)

## इतर भाजीपाला

| भाजीपाला | वाण | बियाण्याचे प्रमाण प्रति एकर | लागवडीचे अंतर |
|---|---|---|---|
| वाल | कोकण भूषण, अर्का विजय | ४ किलो | ४५ बाय ३० सेंमी |
| चवळी | पुसा दो फसली, पुसा बरसती, पुसा कोमल | ८ किलो | सपाट वाफा ६० बाय ४५, ४५ बाय ३० सेंमी |
| गवार | पुसा नवबहार, पुसा सदाबहार | २.५ ते ३ किलो | सपाट वाफा ६० बाय ३० सेंमी |
| पालक | ऑलग्रीन, पुसा ज्योती, जोबनेर ग्रीन | १२ ते १६ किलो | सपाट वाफा बी पेरून २०-३० सेंमी ओळीत |
| काकडी | हिमांगी, शीतल, पुणे खिरा, फुले शुभांगी, फुले प्राची | १ किलो | सपाट वाफा, दंडाच्या बाजूस बी टोकून १ बाय १ मीटर |
| कारली | कोइमतूर लाँग, अर्का हरित, हिरकणी, कोकण तारा | १.५ ते २ किलो | सपाट वाफा, दंडाच्या बाजूस बी टोकून १ बाय १ मीटर |
| ढेमसे | अर्का टिंडा | १ ते १.५ किलो | सपाट वाफा, दंडाच्या बाजूस बी टोकून १ बाय १ मीटर |
| दुधी भोपळा | सम्राट, पुसा मेघदूत, पुसा नवीन, अर्का बहार | १ ते २ किलो | दांडाच्या काठाने लहान आळे करून त्यात बी टोकून लावावे. ३ बाय १.५ मीटर |
| कोहळा (लाल भोपळा) | अर्का सूर्यमुखी, अर्का चंदन | २ ते २.५ किलो | दांडाच्या काठाने लहान आळे करून २.५ ते ३ बाय २ ते २.५ मीटर |
| चोपडा दोडका | पुसा चिकणी, पुसा सुप्रिया | १ ते १.५ किलो | दांडाच्या काठाने लहान आळ्यात बी टोकून १.५ बाय १ मीटर |
| शिरी दोडका | पुसा नसदार, कोकण हरित, फुले सुचिता | १.५ ते २ किलो | दांडाच्या काठाने लहान आळ्यात बी टोकून १.५ ते २ मीटर बाय १ ते १.५ मीटर |

## टोमॅटो

- वाण : भाग्यश्री, धनश्री, राजश्री, फुले राजा (संकरित).
- जमिनीची मशागत करताना २० टन प्रति हेक्टरी चांगले कुजलेले शेणखत मिसळून घ्यावे. जमिनीत असलेल्या गवताच्या काड्या, हरळीच्या काश्या, लव्हाळा गाठी वेचून जाळून टाकाव्यात. ९० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडून जमिनीच्या उतारानुसार वाफे बांधून घ्यावेत. लागवड करतेवेळी दोन रोपांतील अंतर ३० सेंमी ठेवावे. लागवडीसाठी ३.६० मी. × ३ मी. आकारमानाचे वाफे तयार करावेत.
- रोपांची लागवड करताना : टोमॅटोची रोपे तयार झाल्यानंतर लागवडीच्या वाफ्यांना आठवड्यापूर्वी पाणी देऊन वाफसा स्थितीत वाफे आणावेत. लागवडीच्या दिवशी वाफ्यांना पुन्हा पाणी द्यावे. वाफ्यांमध्ये पाणी असतानाच रोपांची लागवड करावी. मरगळलेली, इजा झालेली, मुळे कमी असणारी, वाकडे व चपटे खोड असणारी तसेच रोगग्रस्त रोपे लागवडीसाठी घेऊ नयेत. लागवडीपूर्वी रोपे कार्बोसल्फान १० मिलि व कार्बेन्डाझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या द्रावणात बुडवून घ्यावीत. रोपे लावताना रोपांच्या खोडावर दाब देऊ नये. अन्यथा नाजूक खोड पिचल्यामुळे अशी रोपे नंतर मरतात. लागवड केल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी आंबवणीचे पाणी द्यावे. लागवडीनंतर १० दिवसांमध्ये एकदा सर्वेक्षण करून मेलेल्या रोपांच्या जागी नांग्या भरून घ्याव्यात.

## वांगे

- महाराष्ट्रात वेगवेगळ्या विभागामध्ये वांगी पिकाच्या रंग आणि आकारानुसार अनेक जातींची लागवड केली जाते.
- सुधारित जाती : मांजरी गोटा, कृष्णा, फुले हरित, फुले अर्जुन, को-१, को-२ व पी.के.एम. १
- जमीन : चांगली निचरा असलेली मध्यम काळी कसदार जमीन या पिकासाठी चांगली असते.
- बियांचे प्रमाण : सुधारित जातीसाठी हेक्टरी ४०० ते ५०० ग्रॅम बी लागते. संकरित जातीसाठी हेक्टरी १२० ते १५० ग्रॅम बी पुरेसे असते.
- रोप लागवडीपूर्वी जमिनीची नांगरट करून चांगली मशागत करून (हेक्टरी ३० ते ४० टन) शेणखत मिसळून द्यावे.
- लागवड अंतर : १) जमिनीच्या प्रकारानुसार, अ) हलकी जमीन -७५ × ७५ सें.मी., ब) भारी जमिनीसाठी १२० × ९० सें.मी.
- २)जातीनुसार, अ) संकरित जातीसाठी - ९० × ९० सें.मी., ब) कमी वाढणाऱ्या जातीसाठी/ मध्यम जमिनीत - ९० × ७५ सें.मी.

## भेंडी

- **जमीन** : मध्यम काळ्या किंवा पोयट्याच्या जमिनीत भेंडीची वाढ चांगली होते. हलक्या जमिनीमध्ये पिकाची वाढ जोमदार होते नसल्याने उत्पादन व दर्जामध्ये विपरीत परिणाम जाणवतो. त्यासाठी अशा जमिनीत जास्तीत - जास्त सेंद्रिय खतांचा वापर करावा. जमिनीचा सामू ६ ते ७ च्या दरम्यान असावा.
- **जाती** : १)अर्का अनामिका : आय. आय. एच. आर. बंगलोर येथे विकसित या जातीची झाडे उंच वाढतात. फळे गर्द हिरव्या रंगाची, गुळगुळीत व लांब असतात. फळांचे देठ लांब असल्याने काढणी लवकर उरकते. पुसा सावनी व इतर प्रचलित जातींपेक्षा उत्पादन अधिक मिळते. ही जात खरीप व उन्हाळी दोन्ही हंगामांत लागवडीस योग्य आहे.
- २) परभणी क्रांती : फळे व ८ ते १० सेंमी लांबीची असतात. खरीप, उन्हाळी दोन्ही हंगामांत लागवडीस योग्य जात आहे.
- ३) अर्का अभय : अर्का अनामिकासारखीच या जातीची फळे असून विशेष म्हणजे या जातीमध्ये फांद्या फुटत असून, दोन बहर मिळतात.
- ४) पुसा सावनी : भारतीय कृषी संशोधन संस्था, नवी दिल्ली येथून विकसित जातीची फळे १० ते १५ सेंमी लांब असून, झाडांवर काटेरी लव असते. झाडांचे खोड, देठ आणि पानांच्या खालील बाजूस हिरवा रंग असून त्यावर तांबूस छटा असते. खरीप व उन्हाळी दोन्ही हंगामात लागवडीस योग्य अशा या जातीच्या झाडांची फुले पिवळ्या रंगाची असून, फुलांच्या प्रत्येक पाकळीवर देठाकडील भागावर जांभळ्या रंगाचा ठिपका असतो. सरासरी एकरी ४ ते ५ टन उत्पादन मिळते.
- **लागवड :** नांगरट केल्यानंतर ढेकळे फोडून घ्यावीत. त्यानंतर उभ्या-आडव्या दोन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवाच्या पाळीअगोदर प्रति हेक्टर २० ते २५ टन चांगले कुजलेले शेणखत टाकून जमिनीत चांगले मिसळून घ्यावे. लागवड करताना ६० सें. मी. अंतरावर सरी पाडून सरीच्या दोन्ही बाजूंस टोकण पद्धतीने ३० १५ सें. मी. अंतरावर भेंडीची लागवड करावी. लागवडीसाठी प्रति हेक्टरी १५ किलो बियाणे वापरावे. मर रोगाच्या नियंत्रणासाठी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरम अथवा कार्बेन्डाझिम किंवा पावडर स्वरूपातील ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम चोळावे.

# उसावर तपकिरी ठिपके, तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव

**ढगाळ, दमट हवामान, पावसाच्या खंडाच्या काळात उसावर प्रामुख्याने तपकिरी ठिपके आणि तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. प्रादुर्भावाची लक्षणे ओळखून उपाययोजना कराव्यात.**

## तपकिरी ठिपके (रोगकारक बुरशी)

**लक्षणे** : उसाच्या जुन्या पानांच्या दोन्ही बाजूंवर अंडाकृती आकाराचे लालसर ते तपकिरी रंगाचे ठिपके दिसतात. ठिपक्यांभोवती पिवळ्या रंगाचे वलय दिसते. ठिपक्याचा मध्यभाग वाळून करड्या रंगाचा, सभोवती लाल कडा त्याला लागूनच पिवळे वलय असे एकमेकांत मिसळलेले असंख्य ठिपके दिसतात. अनकूल वातावरणात सर्व पानांवर प्रादुर्भाव दिसतो. ठिपक्यांची संख्या वाढून ठिपके एकमेकांत मिसळून मोठे ठिपके तयार होतात. ठिपक्यांमधील पेशी मरतात, प्रकाश संश्लेषण होत नाही. प्रादुर्भाव वाढल्यास उसाच्या कांड्यांची लांबी व जाडी कमी होते.

## तांबेरा : (रोगकारक बुरशी, तपकिरी तांबेरा अन् नारंगी तांबेरा)



**लक्षणे** :बुरशीचा प्रादुर्भाव पानाच्या दोन्ही बाजूंना होऊन पानावर लहान, लांबट आकाराचे पिवळे ठिपके दिसतात. कालांतराने ठिपक्यांची लांबी वाढून त्यांचा रंग लालसर तपकिरी होतो. ठिपक्याच्या भोवती फिक्कट पिवळसर हिरवी कडा तयार होऊन पानाच्या खालच्या बाजूस ठिपक्याच्या जागेवर उंचवटे तयार होतात. ठिपके फुटून



नारंगी किंवा तांबूस तपकिरी रंगाचे बिजाणू बाहेर पडतात. हवेद्वारे बीजाणूंचा प्रसार होतो. पानांवरील ठिपक्यांची संख्या वाढून शेजारील ठिपके एकमेकांत मिसळून मोठे ठिपके तयार होतात. या रोगग्रस्त ठिपक्यातील पेशी मरून जाऊन पाने करपलेली दिसून येतात. रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रकाश संश्लेषण प्रक्रियेमध्ये अडथळा येऊन अन्न तयार करण्याची प्रक्रिया मंदावते. ऊस उत्पादन आणि साखर उताऱ्यात घट दिसते.

## एकात्मिक पद्धतीने नियंत्रणाचे उपाय

लागवड फेब्रुवारी ते मे या महिन्यांमध्ये करू नये. बेणे मळ्यातील रोगमुक्त बेणे निवडावे. रोगप्रतिकारक्षम जातींची (को-८६०३२) लागवड करावी. बेणे कार्बेन्डाझिम द्रावणात (१०० ग्रॅम कार्बेन्डाझिम प्रति १०० लिटर पाणी) दहा मिनिटे बुडवावे. त्यानंतर लागवड करावी. योग्य निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड करावी. लागवडीसाठी रुंद सरी किंवा पट्टा पद्धतीचा अवलंब केल्यास रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. शिफारशीनुसार नत्राची मात्रा द्यावी. जास्त वापर झाल्यास रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. रोगामुळे बाधित ऊस (शेंडे कूज अथवा पांगशा फुटलेले ऊस) नष्ट करावेत.

- तपकिरी ठिपके रोग नियंत्रण : (फवारणी प्रतिलिटर पाणी) : मॅन्कोझेब किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड (३ ग्रॅम) पंधरा दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या. द्रावणामध्ये सर्फेक्टंट मिसळावा.
- तांबेरा रोग नियंत्रण : (प्रतिलिटर पाणी) : मॅन्कोझेब ३ ग्रॅम किंवा टेब्यूकोनॅझोल १ ग्रॅम पंधरा दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या. द्रावणामध्ये सर्फेक्टंट मिसळावा.

### पोक्का बोंग रोगाची लक्षणे

पाने कुजल्याने, गुरफटल्याने आणि कांड्यांचे पोषण होत नसल्याने कांड्या आखूड व वेड्यावाकड्या होतात. काहीवेळा रोगाची तीव्रता वाढल्यावर पोंगामर किंवा शेंडाकुज दिसून येते. काही वेळेस रोगग्रस्त कांड्यांवर कांडी काप (नाइफ कट) रोगाची लक्षणे दिसून येतात. शेंडाकुज व कांडी काप (नाइफ कट) झालेल्या उसातील शेंडा जोम नष्ट होतो. त्यामुळे उसावरील डोळ्यातून पांगशा फुटतात व कालांतराने असे ऊस वाळतात.

# शालेय शिक्षणात मोठे बदल

## तिसरी ते दहावीपर्यंत तिसरी भाषा हद्दपार

**पुणे(प्रतिनिधी)** -राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्य सरकारने इयत्ता तिसरी ते दहावीसाठी शालेय शिक्षणा-चा नवीन अभ्यासक्रम मसुदा तयार केला आहे. यामध्ये इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा सक्तीची करणाऱ्या शालेय शिक्षण विभागाने आता आपल्या भूमिकेपासून फारकत घेऊन इयत्ता तिसरी ते दहावीच्या प्रस्तावित अभ्यासक्रमातूनही तिसरी भाषा हद्दपार केली आहे. यामध्ये मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र;



तसेच कलाशिक्षण, व्यावसायिक शिक्षण, शारीरिक शिक्षण आणि पायाभूत मूल्य शिक्षणाचे विषय समाविष्ट करण्यात आले आहेत.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) तयार केलेला हा 'अभ्यासक्रम मसुदा ु.ारर.रल.ळप २०२५' या वेबसाइटवर उपलब्ध असून, २८ जुलैपासून नागरिकांना अभिप्राय देता येणार आहे, अशी माहिती 'एससीईआरटी'चे संचालक राहुल रेखावार यांनी दिली. सध्या तिसरी ते पाचवीसाठी असणाऱ्या 'परिसर अभ्यास' विषयाऐवजी 'आपल्या सभोवतालचे जग (भाग एक, दोन) विषय असेल. चौथीसाठीचे विद्यमान पाठ्यपुस्तक 'शिवछत्रपती' आहे तसेच राहील. तिसरीसाठी जिल्हा, चौथीसाठी राज्य आणि पाचवीसाठी देश अशा पद्धतीने आशय आहे. इयत्ता अकरावी आणि बारावीचा अभ्यासक्रम अंतिम झाल्यानंतर त्याआधारे राज्य मंडळाच्या अकरावी, बारावीचा अभ्यासक्रम तयार करण्यात येईल. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिभाषा धोरण अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात आली. तिच्या शिफारशींचा विचार करून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. तोपर्यंत सध्याची अभ्यासक्रम प्रणाली आहे तशी सुरू रा-हील, असे 'एससीईआरटी'कडून सांगण्यात आले. मराठी भाषेचा अभ्यासक्रम अंतिम झाल्यानंतर, मराठी भाषेचा आधार घेऊन अन्य प्रथम व द्वितीय स्तराच्या भारतीय भाषांचा अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्यात येईल.

# पहलगाम हल्लयातील संशयित तीन दहशतवाद्यांना कंठस्नान, श्रावणी सोमवारी ऑपरेशन 'महादेव' फत्ते

**श्रीनगर (प्रतिनिधी)** जम्मू आणि काश्मीरच्या श्रीनगरमध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये मोठी चकमक झाली. या चकमकीत तिघा दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात भारतीय सैन्य दल-ला यश आले आहे. श्रा-वणी सोमवारी राबवलेल्या या मोहिमेला ' ऑपरेशन महादेव ' असे नाव देण्यात आले आहे. कंठस्नान घात-लेले तिघांपैकी दोघे अतिरेकी पहलगाम हल्लयातील संशयित असल्याची प्राथमिक माहिती आहे, मात्र यास अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. .

जम्मू आणि काश्मीरच्या श्रीनगरमधील दाचीगाम राष्ट्रीय उद्यानाजवळील हरव-ान भागात चकमक झाली. आज, सोमवारी झालेल्या या चकमकीत तीन दहशतवाद्यांना ठार मारण्यात आले. गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी हे ऑपरेशन सुरू केले होते. विशेष म्हणजे संसदेमध्ये ऑपरेशन सिंदूर या विषयावर चर्चा सुरु असतानाच ऑपरेशन महादेव बाबत आनंदवार्ता आली. भारतीय सैन्याच्या चिनार कॉर्प्सने 'एक्स' (ट्विटर) सोशल मीडिया अकाऊंटवर यासंदर्भात माहिती दिली. सातत्याने झालेल्या गोळीबारानंतर तीन दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. ऑपरेशन अजूनही सुरु आहे, असे त्यांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरवानमधील मुलनार भागात सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई सुरु केली.

त्यावेळी दोन वेळा गोळीबाराचा आवाज ऐकू आला. त्यानंतर अधिक कुमक पाठवण्यात आली. दहशतवाद्यांना मारण्यासाठी शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आली.

पहलगाम हल्लयातील दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांनी मोठी मोहीम सुरू केली होती. एप्रिल महिन्यातील २३ तारखेला झालेल्या अतिरेकी हल्लयात २६ जणांचा मृत्यू झाला होता. यामध्ये महाराष्ट्रातीलही काही पर्यटकांचाही समावेश होता. त्यानंतर काही दिवसांच्या आत ऑपरेशन सिंदूर राबवत पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उद्धस्त करण्यात आले होते.गेल्या महिन्याभरातील गुप्तचर माहितीवरुन असे दिसून आले होते की दहशतवादी श्रीनगर शहराच्या केंद्रापासून सुमारे २० किमी अंतरावर असलेल्या दा-चीगाम भागात गेले असावेत. त्यानंतर भारतीय सैन्यदलाने गुप्त ऑपरेशन राबवून दहशतवाद्यांना यमसदनी धाडले आहे.

# बॅडमिंटन खेळता-खेळता तरुणाचा हार्टअॅटकने मृत्यू

**हैद्राबाद (प्रतिनिधी)** -बॅडमिंटन खेळताना अच-ानक कोसळल आणि एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. हैदराबादच्या नागोले स्टेडियममध्ये बॅडमिंटन खे-ळताना या २५ वर्षीय तरु-णाचा अचानक मृत्यू झाल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार या तरुणाचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला आहे. या घटनेचा व्हिडिओही समोर आला आहे.

रात्री ही घटना घडली. येथील गुंडला राकेश हा नागोले स्टेडियममध्ये त्याच्या मित्रांसोबत बॅडमिंटन खेळत होता. खेळता खेळता तो अच-ानक बेशुद्ध होऊन कोसळला. हे पाहताच त्याचे मित्र त्याच्याकडे धावले. त्याच्या मित्रांनी त्याला ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेले, परंतु तिथे डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

# बोगस नियुक्तीचा मोठा घोटाळा उघड

## PWD लिपिकांनी बनावट सह्यांवर ३१ जणांना दिल्या नोकऱ्या

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** -सार्वजनिक बांधकाम विभाग ात शिपाई, चौकीदार आणि सफाई कामगार पदावर बोगस नियुक्ती केल्याचे प्रकरण समोर आले आहे. गेल्या दहा वर्षात लिपीक पद-ावर काम करणाऱ्या दोघांनी कार्यकारी अभियंत्यांच्या बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करून तब्बल ३१ जणांना शासकीय सेवेत नियुक्त झाल्याचे पत्र दिल्याचे प्रकरण समोर आले आहे. बोगस नियुक्तीपत्र देणाऱ्यांचे नाव बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपिक अंकुश श्रीरंग हिवाळे (रा. सौजन्यनगर, काल्डा कॉर्नर) असे वरिष्ठ लिपिकाचे, तर कनिष्ठ लिपीक उज्ज्वला अनिल नरवडे (रा. सार्वजनिक बांधकाम विभाग क्वार्टर, गोपाल टी) असे आहे. बोगस नियुक्तीपत्र देणारे दोन्ही कर्मचारी सध्या बडतर्फ आहेत.

या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) कार्यकारी अभियंता शेषराव काशीनाथ चव्हाण (वय ५५) यांनी तक्रार दिली. वर्ष २०१५ ते २०२५ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जालना व लातूर येथील सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग विभागांतर्गत ३१ जणांना शिपाई, चौकीदार व सफाई कामगार अशा पदांवर नियुक्त करण्यात आले. या नियुक्त्यांसाठी कोणतीही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली नव्हती, ना कुठलीच अधिकृत भरती प्रक्रिया राबवली गेली. तरीदेखील संबंधित कर्मचाऱ्यांनी कार्यकारी अभियंत्यांच्या स्कॅन केलेल्या किंवा मॉर्फिंगद्वारे तयार केलेल्या बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करत खोट्या नियुक्तीपत्रांद्वारे उमेदवारांना शासकीय सेवा मिळवून दिली. या नियुक्तीसाठी आर्थिक व्यवहार झाल्याचाही संशय व्यक्त करण्यात आला आहे.

# निवृत्ती वेतनधारकांनी आधारकार्ड व पॅनकार्डसंलग्न करण्याचे आवाहन

**लातुर (प्रतिनिधी)**- जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक व कुंटूंब निवृत्तीवेतनधारकयांनी भारत सरकारच्या आयकर विभागामार्फत जारी करण्यात आलेल्या परिपत्रक क्रमांक०९/२०२५ नुसार आपले



आधारकार्ड सोबत पॅनकार्ड दि. ३० सप्टेंबर, २०२५ पूर्वी संलग्न(लिंक) करावे. विहीतमुदतीत आधारकार्ड व पॅनकार्ड संलग्न न केल्यास ऑक्टोबर २०२५ च्या निवृत्तीवेतनातूनव कुंटूंब निवृत्तीवेतनातून आयकर कायद्यान्वये जास्तीचा आयकर कपात करण्यात येईल, असे जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील व अप्पर कोषागार अधिकारी के. एन. खोजे यांनीकळविले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'मिशन बाल भरारी' एआय अंगणवाडीचा शुभारंभ

**नागपुर (प्रतिनिधी)** नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत बालवाडीच्या माध्यमातून लह-ानपणीच बालमनावर एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी, महानगरातील मुलांना ज्या सेवासुविधांच्या माध्यमातून घरच्याघरीच जो विश्वास मिळतो तो विश्वास ग्रामीण भागातील अंगणवाड्यांमध्ये शिकणाऱ्या मुलांनाही मिळावा यादृष्टीने 'मिशन बाल भरारी' उपक्रमाचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.




मेट्रो भवन येथे भारता-तील पहिल्या एआय अंगणवाडी उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री कृष्णा खा-पडे, प्रविण दटके, संजय मेश्राम, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी व मान्यवर उपस्थित होते.

ही भारतामधील पहिली आगळीवेगळी पायलट योजना असून, अंगणवाडी ताईंना या स्मार्ट साधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. 'मिशन बाल भरारी' अंतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या नेतृत्वाखाली नागपूर जिल्ह्यात आणखी ४१ एआय अंगणवाड्या सुरू करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी मिटवून प्रत्येक मुलाचा उत्साह वाढावा, आनंद आणि कुतूहलाने त्याला शिकता यावे, हा या उपक्रमामागील भावनिक संकल्प आहे. हा संकल्प महाराष्ट्रातील बालशिक्षणामध्ये ऐतिहासिक बदल घडवेल असा विश्वास विनायक महामुनी यांनी व्यक्त केला.

भारताची पहिली एआय-सक्षम अंगणवाडी म्हणून गणना होणाऱ्या हिंगणा तालुक्यातील वडधामना येथे सुरू करण्यात आलेल्या मुलांना यातून कविता, गाणी आणि अभ्यासक्रम शिकविण्यासाठी व्हिआर हेडसेट्स, एआय-संलग्न स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि इंटरॅक्टिव्ह डिजिटल कंटेंट यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. ही सोय प्रीमियम खासगी बालवाड्यांमध्येही उपलब्ध नाही, असे वैशिष्ट्य या प्रकल्पात आहे.

## जिल्हा परिषद बांधकाम विभाग नांदेड


## ई निविदा सुचना क्र.५ सन २०२५-२०२६

जिल्हा परिषद बांधकाम विभाग नांदेड अंतर्गत निविदा सुचना ५ ई निविदा एकूण कामे दोन (तिन कामे एकत्र खुला कंत्राटदारास व एक काम मजुर सहकारी संस्था) https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**कार्यकारी अभियंता**
**जिल्हा परिषद बांधकाम विभाग नांदेड**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## Change In Name

My old Name is MIRZA ANAS FAIZAN BAIG Which now am changing as New Name MIRZA ANAS FAIZAN BAIG MIRZA AIJAZ BAIG Hence forth My All correspondence will be done as per my new name please consider the same

ADD-MIRZA ANAS FAIZAN BAIG MIRZA AIJAZ BAIG PLOT NO 12 NILOFER COLONY TARODA (BK) NEAR B&C COLONY NANDED 431605 (M.S)

## टी.सी हरवली

माझी शेख जाकीराबी शेख अजगर या नावाची, ९ वी पासची टी. सी. नांदेड ते जैतापुर बस प्रवासात हरवली आहे.कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**-संपर्क पत्ता-**
**शेख जाकीराबी शेख अजगर**
**रा.नाळेश्वर ता.जि.नांदेड मो.९७६७२८०२८१**

## टी.सी हरवली

माझी पांडुरंग चंपती ठाकरे या नावाची, वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी, नांदेड येथून काढलेली बारावी उत्तीर्ण असलेली टी.सी. व आधार कार्ड वगैरे कागदपत्रे बस प्रवासात हरवली आहेत. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावेत.

**पत्ता :- पांडुरंग चंपती ठाकरे**
**रा. बोरगाव (ह.) पो. हस्तरा ता. हदगांव**

## मूळ खरेदी खत हरवले

मी संजय हणमंतराव पाटील रा, देगाव रोड, देगलूर. मी देगलूर महाविद्यालयातून भाजी मंडई मार्ग घरी जात असताना माझ्या ताब्यातील मूळ खरेदी खत ज्याचा दस्त क्रमांक ८७/ २००८ दि. २९ -१ - २००८ दुय्यम निबंधक कार्यालय देगलूर येथे केलेले दस्त हरवले आहे. सदरील दस्त कुणास सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क करावा. योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**संपर्क पत्ता -**
**संजय पि. हणमंतराव पाटील रा. देगाव रोड, देगलूर जिल्हा नांदेड मोबाईल नंबर ७०३०८८८४७८**

## टी.सी हरवली

माझी शुभम संजय धनसुरे या नावाची दहावी अनुत्तीर्ण (नापास) ची टि सी देगलूर ते नांदेड प्रवासात हरवली आहे, कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता -**
**शुभम संजय धनसुरे**
**मु.पो.खानापूर ता.देगलूर.जि.नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी सविता नागोराव सूर्यवंशी या नावाची इयत्ता १२ वी कला शाखा नापासची टी. सी. घुंगराळा ते नायगाव दरम्यान बस प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**- संपर्क पत्ता-**
**सविता नागोराव सूर्यवंशी**
**रा. घुंगराळा, ता. नायगाव, जि. नांदेड**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी मुखेड यांच्या न्यायालयात ज्या आर्थिक अर्जदार श्री शेख मोतीपाशा शादुल साब रा . पाळा ता . मुखेड जि . नांदेड वय ४० वर्ष यांनी त्यांचा मुलगा रिजवान मोतीपाशा शेख यांची जन्माची दि .२२ /०२/२०१२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे पाळा येथे जन्म झाला असून सदर जन्म मृत्यू नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ ( २ ) व (३) अन्वये घेण्याकरता जन्ममृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय पाळा ता . मुखेड जि . नांदेड यांना आदेशित करण्यायासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे .

ज्या अर्थी रिजवान मोती पाशा शेख यांची जन्माची नोंद ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय पाळा ता . मुखेड जि . नांदेड येथे उपलब्ध नाही .

त्याअर्थी या जाहीर प्रकटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की अर्जदार यांच्या मुलाची जन्माची दि.२२/०२/२०१२ रोजी नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांक पासून ३० दिवसांमध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा विहित मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल .

**तालुका दंडधिकारी**
**मुखेड**

## बिलोली नगरपरिशद जि.नांदेड

## निविदा सुचना

मुख्याधिकारी नगर परिषद बिलोली जि.नांदेड यांच्याकडील भांडार विभागातील शहरा-तील विविध ठिकाणी CCTV कॅमेरा PA व सिस्टम बसविणे बाबातची सुचना प्रसिद्ध करून मागविण्यात येत आहे.निविदेच्या पुर्व अर्हता अटी व शर्ती या नुसार सविस्तर निविदा सुचना बाबत दिनांक २९/७/२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक ५/८/२०२५ दुपारी ५.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहे.तरी इच्छूकांनी निविदा दिनांक ५/८/२०२५ रोजी वेळी दुपारी ५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील

**स्वा/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद बिलोली**

श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

## महात्मा गांधी डीएड कॉलेज, सिडको नवीन नांदेड.

(महाराष्ट्र शासन व एनसीटीई, भोपाळ, मान्यता प्राप्त)

**डी.एल.एड. प्रवेश (२०२५-२६)**

**मराठी माध्यम (१०% व्यवस्थापन कोटा प्रवेशासाठी)**

सन 2025-26 या शैक्षणिक वर्षासाठी फक्त खाजगी विनाअनुदानित सरस्वती अध्यापक विद्यालयातील डी.एल.एड. प्रथम वर्ष नियमित अभ्यासक्रमासाठी प्रवेशपात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

- ऑनलाईन अर्ज सादर करणे:- 25/07/2025(सकाळी ।। वा.) ते 29/07/2025(मध्यरात्री 12 वाजेपर्यंत)
- विद्यार्थ्यांना अध्यापक विद्यालयाच्या लॉगींग मध्ये समाविष्ट करुन घेणे : 25/07/2025 (सकाळी ११:००वा.) ते ३१/०७/२०२५ ( साय. ०६:००वा.)
- प्रवेश अर्ज शुल्क : 200/- रुपये ओपन व मागासवर्गीयासाठी 100/- रु. (जातीचे प्रमाणपत्र सोबत आणावे.)
- शैक्षणिक पात्रता : खुल्या संवर्गातील उमेदवारास 12 वीत किमान 49.5 टक्के गुणासह उत्तीर्ण व मागासवर्गीय उमेदवारास 12 वीत किमान 44.5 टक्के गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- शाखा निहाय आरक्षण : विज्ञान-50%, कला-40%, वाणिज्य-09%, व्होकेशनल-01%.

| प्रवेश प्रकार | विज्ञान | कला | वाणिज्य व व्होकेशनल | एकूण |
|---|---|---|---|---|
| व्यवस्थापन कोटा | ०५ | ०४ | ०१ | १० |

- वैधानिक आरक्षण :- एस.सी. एस.टी.- 4 व्हीजेएनटी 2 एस.बी.सी, ओ.बी.सी.- 4 ओपन-10
- एस. टी. संवर्गातील उमेदवाराला जात वैधता प्रमाणपत्र व व्हीजेएनटी एस.बी.सी ओ.बी.सी. यांना नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र प्रवेशासाठी आवश्यक आहे.
- सामाजिक आरक्षण : प्रकल्पग्रस्त, अपंग, माजी सैनिक, आजी सैनिक, स्वातंत्र्य सैनिक, घटस्फोटीत, विधवा, अनाथ, महिला या सामाजीक आरक्षणातुन एक जागा भरली जाईल.
- नोटः- व्होकेशनल शाखेसाठी वाणिज्य शाखेतुन एकुण जागेपैकी 01 टक्का जागा राहील. (फक्त कृषी गटातील हॉटीकल्चर व क्रॉप सायन्स व आरोग्य व वैद्यकीय सेवागटातील केब आणि प्रिस्कुल मॅनेजमेंट हे विषय घेतलेले व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची (FYBA) इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थीच प्रवेशास पात्र असतील.)
- टिप :- शासन नियमानुसार घटनात्मक, सामाजीक, वैधानिक, शाखानिहाय, उपलब्धतेनुसार पाळले जाईल.

प्राचार्य
महात्मा गांधी डी.एड.कॉलेज सिडको,
नवीन नांदेड.

स्थलांतर

सिटी मॅक्स डिजिटल कलर

मो.7058766021,9422185282

गड्डम मार्केट, पहिला मजला,
शिवाजी नगर, नांदेड


# गोदातीर समाचार


पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांकडे वळावे –खा. अशोक चव्हाण

### सीए परीक्षेत देशात अव्वल स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष उल्लेख



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड येथील विद्यार्थ्यांनी केवळ डॉक्टर, अभियंते बनण्यावर समाधान न मानता स्पर्धात्मक परीक्षांकडे वळून आपले करिअर घडवावे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केले. भाजपाच्या जंगम वाडी मंडळातर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

कार्यक्रमात दहावी, बारावी, नीट, जेईई परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांना विशेष सन्मानचिन्ह, वह्या व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना क्रांतिकारकांचे मुखपृष्ठ असलेल्या वह्या, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

खा. चव्हाण पुढे म्हणाले, सीए परीक्षेत नांदेड जिल्ह्याने देशात अव्वल स्थान मिळविल्याचा सार्थ अभिमान आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला शिकण्याची संधी मिळायला हवी. आर्थिक अडचणीमुळे कोणाचेही शिक्षण थांबू नये यासाठी राजकीय नेत्यांनी पुढे यावे. 'तुम्ही शिकवा, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत' या भावनेने काम करणे आज काळाची गरज आहे.

या कार्यक्रमात माजी आमदार व भाजपाचे महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, विभागीय संघटनमंत्री संजय कौडगे, प्रवीण साले, शिवा कांबळे, रमाकांत जोशी, भार्गव राजे, किशोर स्वामी, डॉ. सचिन उमरेकर, विजय येवनकर, सौ. वैशालीताई देशमुख, शितल खांडील, अमोल कदम, मोहनसिंह तौर, राजू यन्नम, विजय गंभीरे, पुष्पाताई वानखेडे, व्यंकटेश जिंदम, अनिल हजारी, बागड्या यादव, श्रावण पाटील भिलवंडे, सौ. वैशाली देशमुख, डॉ. सचिन उमरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अमरनाथ राजूरकर, शिवा कांबळे यांनीही विचार मांडले. तर प्रवीण साले यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्य व जागतिक भाषा शिकण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रास्ताविक संयोजक आशिष नेरलकर यांनी केले. सूत्रसंचालन धाराशिव शिराळे व आभार अनिल डोईफोडे यांनी मानले. यावेळी 'अमृत' उपक्रमाच्या स्टॉलचा विशेष उल्लेख करत अनिल डोईफोडे, मनीषा कुंनसावळीकर, ओंकार शेटे, सौरभ कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सदाशिव कल्याणकर, प्रवीण कुलकर्णी, जयेश कुलकर्णी, अमोल चौधरी, कैलास वडजे, क्षितिज जाधव, आशुतोष धर्माधिकारी, संकेत कोत्तावार, श्रीकांत चिंचलवाड, बळीराम लाडेकर यांनी विशेष मेहनत घेतली.

भारतीय जनता पक्षाच्या जंगमवाडी मंडळाचे अध्यक्ष आशिष नेरलकर यांनी शहर पातळीवर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ घेतल्याबद्दल खा. अशोकराव चव्हाण यांनी त्यांचे व त्यांच्या टीमचे विशेष कौतुक केले. हा उपक्रम प्रेरणादायी असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक व सकारात्मक उपक्रम राबविल्याबद्दल जंगमवाडी मंडळाच्या टीमचे त्यांनी कौतुक केले.

## एकाच अपिलार्थींचे ८१ अपील अर्ज राज्य माहिती आयोगाने फेटाळले

**नांदेड(प्रतिनिधी)**–नांदेड येथील जनक रामराव गायकवाड या अपिलार्थीने राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत दाखल केलेले ८१ द्वितीय अपील आयोगाने फेटाळले आहेत. यासोबतच १९ अपिलार्थींनी दाखल केलेले ७ हजार ५६७ द्वितीय अपील अर्ज आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळले आहेत.

अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. अशा मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करणाऱ्या खालील नमूद अपिलार्थींची द्वितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.

बहुतांश अपिलार्थी कार्या-लयाकडे वारंवार अर्ज सादर करतात. अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थी यांनी जेवढ्या ग्रामपंचायत कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केले त्या सर्व ग्रामपंचायत कार्यालयात स्वतंत्र जन माहिती अधिकारी पद-निर्देशित आहेत. मात्र अशा सर्व जन माहिती अधिकारी यांचेसाठी केवळ एकच प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित आहेत. बहुतांश वेळा अपिलार्थी जेवढे माहितीचे अर्ज दाखल करतात जवळजवळ तेवढेच प्रथम अपिले दाखल करतात. या परिस्थितीत दैनंदिन कामकाज सांभाळून प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. मोठ्या संख्येने प्राप्त झालेल्या अर्जाचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावरुन होऊन सर्वसामान्य नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे, अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. या अपिलार्थींची व्दितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात संबंधितांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास/प्राधिकरणास वेठीस धरत आहेत. त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये, प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे.



**नांदेड** –गुरूद्वारा कायदा १९५६ चे कलम ११ मध्ये संशोधन करून अध्यक्ष निवडण्याचा अधिकार वर्षे २०१५ मध्ये सरकारने स्वतःकडे वर्ग करून घेतला. अध्यक्ष निवडीचा अधिकार पुन्हा गुरूद्वारा बोर्डाला आणि गुरूद्वारा सरकार मुक्त करण्यात यावा या मागणीकरिता गुरूद्वारा बचाव संघर्ष समितीच्या माध्यमातून नांदेड येथून एक जत्था समितीचे अध्यक्ष जरनैलसिंग गाडीवाले यांच्या नेतृत्त्वात दिल्ली जंतर-मंतरवर आयोजित आंदोलनासाठी रवाना झाला. हा जत्था सिंगसाहीब रामसिंगबाबा यांनी रवाना केला. (छाया-करणसिंह बैस)

## मनपात शीख धर्मियांसाठी 'आनंद विवाह नोंदणी नियम २०२०' ची अंमलबजावणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र शासनाच्या २३ एप्रिल २०२० रोजीच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्र आनंद विवाह नोंदणी नियम, २०२०' च्या अनुषंगाने मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या पुढाकारातून महानगरपालिकेत आता शीख धर्मीयांसाठी आनंद विवाह नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे शीख नागरिकांना त्यांच्या विवाह नोंदणीसाठी सुलभ आणि कायदेशीर मार्ग उपलब्ध होणार आहे.

आनंद विवाह अधिनियम, १९०९ अंतर्गत महाराष्ट्रात आनंद विवाह नोंदणी नियम, २०२० ची अंमलबजावणी करणे आणि शीख धर्मीयांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी विवाह निबंधकांची नियुक्ती करणे आवश्यक होते. या संदर्भात महानगरपालिकेने मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या पुढाकारातून तसेच अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या नियंत्रणात महापालिकेने योग्य ती कार्यवाही पूर्ण केली आहे. वजिराबाद क्षेत्रातील शीख धर्मीयांची संख्या लक्षणीय असल्याने शीख धर्मीयांना सोयीचे व्हावे व विवाह नोंदणी प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी, क्षेत्रीय कार्यालय क्र. ४, वजिराबाद येथील 'प्रभाग अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी' यांची 'विवाह निबंधक' म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

## नांदेड-पुणे वंदे भारत रेल्वे सुरू करण्याची खा. रविंद्र चव्हाण यांची रेल्वेमंत्र्यांकडे मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** – मराठवाड्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक दृष्टीने पुणे हे अत्यंत महत्त्वाचे शहर बनले आहे. नांदेड ते पुणे आय.टी. हब शहराला अनेक आय.टी. व्यावसायिक व शैक्षणिक विद्यार्थी दररोज ये-जा करतात.

सद्यस्थितीत नांदेड ते पुणे दरम्यान दिवसभरात एकही रेल्वे गाडी उपलब्ध नसल्याने प्रवाशांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे नांदेड-पूणे-नांदेड वंदे भारत रेल्वेसेवा नांदेड, लातूर, उस्मानाबाद या मार्गाने सुरू करावी, अशी मागणी खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. त्यांच्या या मागणीला रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे येत्या डिसेंबरपर्यंत नांदेड-पुणे वंदे भारत रेल्वेसेवा सुरु करण्याचे संकेत रेल्वेमंत्र्यांनी दिले आहेत.

खा. रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, नवीन नांदेड-पुणे-नांदेड वंदे भारत रेल्वे सेवा नांदेड, लातूर, उस्मानाबाद या मार्गे सुरु केल्यास मराठवाड्यातील लाखो रेल्वे प्रवाशांना मोठा लाभ होणार आहे. हे अंतर सुमारे ५५० कि. मी. आहे. याशिवाय पणवेल-नांदेड गाडी क्र. १७६१३ या रेल्वेचा वेग वाढवण्याची आवश्यकता असून ही गाडी पणवेलहून दुपारी ४:०० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ८:४५ वाजता नांदेड स्थानकावर पोहचते आणि ६४६ कि.मी. अंतर इलेक्ट्रिक इंजिनने पार करते. पनवेल-कुर्डूवाडी स्टेशनचे ३०३ कि.मी. अंतर ६ तास २० मिनिटांत कुर्डूवाडी-नांदेडचे ३७० कि.मी. अंतर १० तास २० मिनिटांत पार करते. परिणामी ही गाडी नांदेड स्थानकावर विलंबाने पोहचत आहे. या रेल्वे गाडीचा वेग वाढविणे तांत्रिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून आवश्यक असल्याचे खा. चव्हाण यांनी म्हटले आहे.

## रेल्वेच्या उड्डाणपुलाचे काम संथगतीने; विद्यार्थ्यांसह प्रवाशांचे हाल; जिल्हाधिकाऱ्यांना भेटणार गाडेगावचे ग्रामस्थ

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराला लागून असलेल्या कामठा ते गाडेगाव मार्गे जाणाऱ्या मुदखेड रस्त्यावरील गाडेगाव येथे रेल्वे विभागाच्यावतीने उड्डाण पूल आणि अंडरब्रिजचे काम सुरू आहे. परंतु हे काम अतिशय संथगतीने होत असल्याने ऐन पावसाळ्यात नागरिकांसाठी काढून दिलेला बायपास रस्ता चिखलमय झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह प्रवाशांना व या भागातील नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

या रस्त्यावरून पायी चालणे सुद्धा अवघड होऊन बसले आहे. गाडेगाव येथील नागरिकांनी यापूर्वीही काम तातडीने मार्गी लावावे, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत व संबंधित रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनाही केली होती, परंतु कामाची गती वाढली नाही. अखेर गाडेगावकर रहिवासी मंगळवार दिनांक २९ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर करणार आहेत.



नांदेड ते गाडेगाव, मातासाब, मुदखेड ये-जा करणाऱ्या नागरिकांना दोन वर्षे पूर्ण झाले तरीही मुख्य रस्ता वापरासाठी उपलब्ध करून देण्यात आला नाही. पर्यायी रस्ता करून दिला तो मात्र पावसाळ्यात चिखलमय झाला आहे. रेल्वे उड्डाणपूल आणि अंडर ब्रिजचे काम शिरिजा कंपनीकडून सुरू आहे. संबंधित कंपनीचे ठेकेदार हे गाडेगाव रेल्वे गेटवर उडान पूल व अंडरब्रिजचे काम सुरू करून तिसरं वर्ष चालू आहे, तरीही काम धिम्या गतीने सुरू आहे. रेल्वे विभागानेही याकडे लक्ष दिले नसल्याने अंडरब्रीजचे कामही अर्धवट सोडण्यात आले आहे. रेल्वे अंडरब्रीजचे केलेले अर्धवट काम तेही निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करण्यात येत आहे. चार महिने झाले अंडर ग्राउंडच्या कामाला तरिही पर्यायी रस्ता झाला नाही. नांदेडला शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.



**नांदेड** –उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते आयोजक माजी आ. मोहन हंबर्डे यांचेकडून शंकरराव चव्हाण चव्हाण शासकीय रूग्णालय विष्णुपुरी येथे औषधी साठा भेट देण्यात आला. यावेळी माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ. अविनाश घाटे, जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, बाळासाहेब रावणगावकर, कार्याध्यक्ष माधव पावडे, मोहमद खान पठाण, सुरेश राठोड, कन्हैया कदम, युवक जिल्हाध्यक्ष बालाजी शिंदे, स्वप्नील इंगळे, साबेर चाऊस, दिलीपराव धर्माधिकारी, साहेबराव धनगे, राहुल हंबर्डे आदींची उपस्थिती होती. (छाया-करणसिंह बैस)

## गुरुद्वारा सचखंड बोर्डाच्या कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवृद्धी लागू

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील गुरुद्वारा सचखंड बोर्डाच्या कर्मचाऱ्यांनी घेतलेले अथक परिश्रम व सुनियोजित कार्यांना लक्षात घेऊन तसेच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या व यात्रेकरुंच्या व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा न केल्यामुळे यात्रेकरूंना खूप सवलत झाली. या बाबीमुळे गुरुद्वारा बोर्डाला याचा लाभ झाला. या बाबीला लक्षात घेऊन गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे प्रशासक डॉ. स. विजय सतवीर सिंघ यांनी नियमानुसार वार्षिक वेतनवृध्दी (इन्क्रीमेंट) बोर्डाच्या कायम कर्मचाऱ्यांना लागू केली आहे.

### कर्मचाऱ्यांतर्फे प्रशासकांचे आभार

या वेतनवृध्दी (इन्क्रीमेंट) मुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंद व उत्साहाचे वातारण पसरले आहे. वेतनामध्ये वाढ झाल्यामुळे गुरुद्वारा बोर्डाचे अधिकारी, विभागप्रमुख, इंचार्ज व सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने प्रशासक विजय सतबीरसिंग यांचे आभार मानण्यात आले. तसेच आगामी काळात येणाऱ्या सर्व ऐतिहासिक पर्व, उत्सव, महल्ले इत्यादी वेळी यात्रेकरूंच्या सुविधेमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे सांगितले.

## शिवसेना संपर्कप्रमुखावर बंडू खेडकर यांनी केलेला आरोप धादांत खोटा; जिल्हाप्रमुख भुजंग पाटील आक्रमक

**नांदेड (प्रतिनिधी)**– ठाकरे शिवसेनेचे संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांच्यावर पैसे घेऊन पदे देतात असा आरोप पक्षातून हद्दपार केलेले बंडू खेडकर यांच्याविरुद्ध आज शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, बबन बारसे आणि ज्योतिबा खराटे यांनी जोरदार टीका केली. बंडू खेडकर यांना शिवसेनेने खूप मोठे केले. पद असताना अतिशय निष्क्रियता दाखवणारे खेडकर हे कुठल्याच शिवसैनिकाच्या सुख-दुःखात धावून गेले नाहीत. पद जाताच शिवसेनेवर आगपाखड करणे त्यांनी थांबवावे अन्यथा गाठ आमच्याशी आहे, असा इशारा पत्रकार परिषदेतून त्यांना देण्यात आला.



शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, बबन बारसे आणि ज्योतिबा खराटे यांनी सोमवार, दि. २८ जुलै रोजी दुपारी एक वाजता शासकीय विश्रामगृहात आयोजित केलेल्या पत्रपरिषदेमध्ये माजी जिल्हाप्रमुख बंडू खेडकर यांच्यावर घणाघाती टीका करीत बंडू खेडकर यांना शिवसेनेसंदर्भात बोलण्याचा कुठलाच अधिकार नाही. निष्ठावंत शिवसैनिकांसारखे बंडू खेडकरांनी कधीच काम केले नाही. कोणाच्या सुख-दुःखातही ते जात नाहीत. माजी आमदार स्व. प्रकाश खेडकर यांच्यामध्ये आणि बंडू खेडकर यांच्यात जमीन-आस्मानचा फरक आहे. प्रकाश खेडकर हे सच्चे शिवसैनिक होते. बंडू खेडकर यांनी शिवसेनेच्या नावाचा केवळ उपयोग केला, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील यांनी केली.

काही दिवसांपूर्वी शिवसेना उबाठा गटाचे नांदेड संपर्कप्रमुख बबन थोरात यांच्याशी शासकीय विश्रामगृहात माजी जिल्हाप्रमुख बंडू खेडकर यांची बाचाबाची झाली होती. हे प्रकरण चर्चेत आल्याने शिवसेनेच्यावतीने सोमवारी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख भुजंग पाटील बोलत होते.

## श्रीक्षेत्र गंगणबीड येथील मंदिरात भाविकांची गर्दी

**नायगाव (प्रतिनिधी)**– नायगाव तालुक्यातील जागृत व लाखो भाविक-भक्तांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीक्षेत्र गंगनबीड येथील शंभू महादेव मंदिरात आज श्रावण मासातील पहिल्या सोमवारी पहाटेपासूनच भाविक भक्तांनी गर्दी केली. अनेक भाविकांनी गंगनबीड येथील शंभू महादेवाचे दर्शन घेतले.

शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेवाचे प्रतिरूप असलेल्या श्रीक्षेत्र गंगनबीड येथील पुरातन महादेव मंदिरात दि. २८ जुलै २०२५ रोजी श्रावण मासातील पहिल्या सोमवारी लाखो भाविक भक्तांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. पहाटेपासूनच पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी श्रीक्षेत्र गंगनबीड येथील मंदिरात विधीवत पूजन करून दर्शन घेतले.

## अर्धापूर व मरखेल ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटख्यासह सव्वानऊ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात राज्य सरकारने बंदी घातलेला अवैध गुटखा खुलेआम विक्री होत असल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अर्धापूर शहरात कारवाई करून एक लाख ८६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. मरखेल पोलिसांनी कबीर वाडीपाटी जवळ छापा मारून सात लाख छत्तीस हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. या दोन्ही कारवाया २७ जुलै रोजी करण्यात आल्या.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत जिल्ह्यातील सर्वच ठाणेदारांनी आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे चालणार नाहीत याची खबरदारी घेतली आहे. पोलिसांना अंधारात ठेवून काही अवैध धंदे चालक डोके वर काढत असतानाच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवायाचा सपाटा सुरू केला आहे. अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अर्धापूर शहरातच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांच्या टीमने २७ जुलै रोजी कारवाई करून ४६ हजार रुपयांचा गुटखा, पान मसाला, सुगंधित सुपारी असा अवैध मुद्देमाल व एक लाख ४० हजार रुपये किमतीची (एमएच २६- ई-१७००) क्रमांकाची कार असा दोन लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अंमलदार गंगाराम जाधव यांच्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात आरोपी अब्दुल सलीम अब्दुल खादर शेख (वय ३९ रा. इंदिरानगर अर्धापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com